
१०४ 
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, रविवार १७ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२३७, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 237 Marathi - Daily - Pune, 17 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
आता वेळे आधीच पडणार पाऊस?
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### देशात एप्रिलमध्ये बेरोजगारीत वाढ

**नवी दिल्ली** - देशातील बेरोजगारीचा दर एप्रिल २०२६ मध्ये ५.२ टक्क्यांवर पोहोचला आहे. हा गेल्या सहा महिन्यांतील सर्वोच्च स्तर ठरला आहे. केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या 'पिरियॉडिक लेबर फोर्स सर्व्हे' (पीएलएफएस) च्या आकडेवारीतून ही




माहिती उघड झाली आहे. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या मासिक अहवालानुसार, मार्च २०२६ मधील ५.१ टक्क्यांच्या तुलनेत एप्रिलमध्ये बेरोजगारीत किंचित वाढ झाली आहे. तसेच एप्रिल २०२५ मध्येही हा दर ५.१ टक्के होता. शहरी भागातील बेरोजगारीत थोडी घट नोंदवण्यात आली असून, मार्चमधील ६.८ टक्क्यांवरून एप्रिलमध्ये ती ६.६ टक्क्यांवर आली आहे. मात्र ग्रामीण भागात बेरोजगारी वाढली आहे. ती ४.३ टक्क्यांवरून ४.६ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. ग्रामीण आणि शहरी भागांतील बेरोजगारीचा एकूण दर साधारण समान पातळीवर राहिल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.




### देशव्यापी औषध विक्रेता संपाला सिंधुदुर्गात पाठिंबा

**सिंधुदुर्ग** - ऑनलाईन औषध विक्रीविरोधात २० मे २०२६ रोजी देशव्यापी बंद पुकारण्यात आला असून, सिंधुदुर्गातील औषध विक्रेत्यांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. हा बंद १९ मे मध्यरात्रीपासून २० मे मध्यरात्रीपर्यंत (२४ तास) राहणार आहे. राज्यातील मोठ्या संख्येने औषध दुकाने बंद



राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आवश्यक औषधे आधीच खरेदी करून ठेवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. अत्यावश्यक सेवा सुरू राहतील. ऑनलाईन फार्मसीकडून मोठ्या सवलतीत औषध विक्री होत असल्याने स्थानिक विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात आला आहे. तसेच नियमांचे उल्लंघन, डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषध विक्री आणि बनावट औषधांचा धोका असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर ऑनलाईन औषध विक्रीवर निर्बंध आणावेत आणि संबंधित अधिसूचना रद्द कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

# जरांगेंचे पुन्हा आंदोलन! मात्र मुंबईत येणार नाही
# हा एकनाथ शिंदेंचा माणूस! सदावर्तेंचा गंभीर आरोप

■ जालना



**मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी पाच महिन्यांनंतर अंतरवाली सराटी येथे आज मराठा समाजाची बैठक घेतली आणि ३० मे पासून पुन्हा मराठा आंदोलनाची घोषणा केली. यावेळी मराठा आंदोलक मुंबईला धडक देणार नसून अंतरवाली सराटीतच आमरण उपोषण करणार आहेत. त्यांनी ही घोषणा केल्यानंतर लगेच ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी पत्रकार परिषद घेऊन गंभीर आरोप केला की, जरांगे हा एकनाथ शिंदे यांचा माणूस आहे. उदय सामंत यांनी त्यांची भेट घेतल्यानंतर जरांगे उदयास आले. जरांगेंना हाताशी धरून फडणवीस यांची बदनामी करण्याचे षड्यंत्र रचले गेले आहे. एकनाथ शिंदे यांनी आत्ताच जरांगे यांना आवर घालावा.**

**जरांगे** पत्रकार परिषदेत म्हणाले की, आश्वासन देऊनही सरकार सातारा गॅझेटची अंमलबजावणी करत नाही. कुणबी प्रमाणपत्रांचे वाटपही त्यांनी थांबवले आहे. आता ३० मेपर्यंत कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप न केल्यास पुन्हा उपोषण आंदोलन सुरू करणार आहे. यावेळचे आंदोलन भयानक असेल. ३ कोटी मराठे या आंदोलनात सहभागी होतील.

२०२३ पासून मनोज जरांगे यांचे हे नववे उपोषण असणार आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र आणि आरक्षण मिळावे यासाठी अनेक मागण्या करत मनोज जरांगे म्हणाले की, हैदराबाद गॅझेटची पूर्ण अंमलबजावणी करा. कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप तातडीने पूर्ण करा. मंत्रिमंडळ उपसमिती भांडण लावते आहे तेव्हा ही समिती बरखास्त करा. नवीन समिती स्थापन करा, मराठा बांधवांच्या रक्ताच्या नात्यातील (सगे-सोयरे) आणि विवाहाच्या नोंदी असलेल्या नातेवाईकांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्याचा अध्यादेश लागू करा. सातारा, कोल्हापूर, पुणे, औंध, मिरज संस्थान गॅझेट लागू करण्याचा शासन आदेश १९९४ नुसार काढा. वाटप केलेल्या कुणबी प्रमाणपत्रांच्या नोंदी ग्रामपंचायतीमध्ये लावा. मराठा आंदोलकांवरील सरसकट गुन्हे मागे घ्या. आरक्षणासाठी बलिदान देणाऱ्या कुटुंबाला महावितरण आणि एमआयडीसीमध्ये नोकरीचा आदेश काढा. मराठा आरक्षणासाठी सरकारने सातारा संस्थानच्या गॅझेटचा जीआर काढू असे सांगितले होते. पण तसे काही केले नाही. आंदोलन केल्याशिवाय सरकार काही ऐकत नाही. हैदराबाद गॅझेटनुसार ३०८ नोंदी निघाल्या ना? अधिकारी सांगतात सरकारने आदेश दिले नाही, मग काय आमच्या पोरांचे वाटोळे झाल्यावर सरकार आदेश देणार का?

सरकारवर गंभीर आरोप करताना जरांगे पुढे म्हणाले की, ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या » पान २ वर

### मुख्यमंत्री मराठा नाही म्हणून जरांगे उचकले! सदावर्तेंची टीका

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मनोज जरांगे-पाटील यांनी पुन्हा आंदोलनाची घोषणा केल्यानंतर वकील गुणरत्न सदावर्ते यांनी तातडीची पत्रकार परिषद घेत त्यांच्यावर जोरदार टीका केली. गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, मनोज जरांगे यांचे आंदोलन हे शेतकरी आणि मराठा समाजाच्या खऱ्या प्रश्नांपासून दूर असून, ते केवळ राजकीय नखरे करत आहेत. मनोज जरांगे हे मराठा समाजाचे नेते नाहीत. जरांगेंना शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी काहीही देणेघेणे नाही. ते कधीही संविधानिक प्रश्नांवर बोलत नाहीत. मनोज जरांगे हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यकर्ते असू शकतात. ते केवळ राजकीय भूमिका घेत आहेत. उदय सामंत भेटल्यावर तो बिळातून बाहेर आला. मराठा नाही असा मुख्यमंत्री झाल्यावर जरांगे उचकला आहे. जरांगेला भीक घालण्याची गरज नाही.

## कलिंगड खाल्ल्याने पुन्हा मृत्यू?
### पित्याचे निधन! मुलगा चिंताजनक

**मुंबईतील पायधूनी येथे काही दिवसांपूर्वी कलिंगड खाल्ल्यानंतर डोकाडिया कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याचे वृत्त पसरले आणि खळबळ माजली. मात्र, एक महिन्याच्या तपासाअंती त्यांचा मृत्यू कलिंगडमुळे झाला नसून उंदराच्या औषधामुळे झाला हे स्पष्ट झाले. त्यानंतर काही दिवसात पुन्हा कलिंगड खाऊन मृत्यू झाल्याचे वृत्त आले. आता तिसऱ्यांदा हाच प्रकार घडल्याचे वृत्त आहे.**



■ भोपाळ

**मध्य प्रदेशातील** शेओपूर येथे कलिंगड खाल्ल्यानंतर इंद्रकुमार परिहार या ४३ वर्षांच्या व्यक्तीचा मृत्यू झाला असून, त्यांच्या २१ वर्षीय मुलाची प्रकृती गंभीर आहे. इंद्रकुमार हे शेओपूर येथे चालक म्हणून काम करत होते आणि कुटुंबासह भाड्याच्या घरात राहत होते. काल रात्री त्यांची आणि त्यांच्या २१ वर्षीय मुलगा विनोदची प्रकृती अचानक बिघडली. त्याआधी दोघांनी कलिंगड खाल्ले होते, असा दावा कुटुंबियांनी केला आहे. प्रकृती गंभीर झाल्याने दोघांनाही तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. इंद्रकुमार यांची स्थिती अत्यंत चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी कोटा येथे हलवण्यात येत असताना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला. मुलगा विनोदवर रुग्णालयात उपचार सुरू असून, तो व्हेंटिलेटरवर आहे.

जिल्हा रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. आर. बी. गोयल यांनी सांगितले की, दोघांनी आधी रात्री जेवणात भोपळा खाल्ला होता आणि त्यानंतर प्रकृती बिघडली. कलिंगड त्यांनी नंतर खाल्ले होते. त्यांना उलट्या, जुलाब असा त्रास झाला नाही. मात्र श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यामुळे हा प्रकार कलिंगडमुळे झाला असावा असे वाटत नाही. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. मात्र कलिंगड खाल्ल्यानंतर प्रकृती बिघडल्याने पुन्हा कलिंगडवर संशय निर्माण झाला आहे.

याआधी अशाच प्रकारची घटना छत्तीसगडमधील जांजगीर-चांपा जिल्ह्यात घडली होती. कलिंगड खाल्ल्यानंतर १५ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला होता आणि तिघांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ते मृत्यू कलिंगड खाऊन झाले की नाही हे निश्चित झाले नाही. पण कलिंगड खाल्ल्यावर त्याला उलट्या व जुलाबाचा त्रास सुरू झाला होता.

## नीट पेपरफुटी प्रकरणाची सूत्रधार प्राध्यापिका मनीषा मांढरेला अटक

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ नवी दिल्ली

**नीट परीक्षा** पेपरफुटी प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणात सीबीआयने 'एनटीए'ची तज्ज्ञ आणि पुण्यातील वरिष्ठ वनस्पतीशास्त्र (बॉटनी) प्राध्यापिका असलेल्या मनीषा गुरुनाथ मांढरे हिला दिल्लीमधून अटक केली आहे. याआधी अटक केलेली आरोपी मनीषा वाघमारे आणि मांढरे या दोघींनी मिळून पेपरफुटीचा कट रचल्याचे पोलीस तपासातून निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणातील एक आरोपी प्रा. पी. व्ही. कुलकर्णी याला सीबीआयने पुण्यातून काल अटक केली. कुलकर्णी हा रसायनशास्त्राचा



प्राध्यापक आहे. तो नीट परीक्षा प्रक्रियेशी संबंधित होता. त्याचा पेपरफुटी प्रकरणात हात असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. कुलकर्णीची सीबीआयच्या पथकाने चौकशी केली. चौकशीत मांढरे ही या प्रकरणात सामील असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तिला सीबीआयने अटक केली. मनीषा मांढरे ही पुण्यात वनस्पतीशास्त्र (बॉटनी) विषयाच्या वरिष्ठ प्राध्यापिका म्हणून एका महाविद्यालयात कार्यरत होती. धक्कादायक बाब म्हणजे ती एनटीएच्या नीट परीक्षेसाठी अधिकृत 'एक्सपर्ट पॅनल'मध्ये होती. या पदामुळे तिला वनस्पतीशास्त्र (बॉटनी) आणि प्राणिशास्त्र (झूलॉजी)च्या » पान २ वर

## मोसमी पाऊस वेळेआधीच अंदमानात २-५ जूनदरम्यान महाराष्ट्रात येणार

■ श्री विजयपूरम

**मागील** वर्षाप्रमाणे यंदाही नैऋत्य मोसमी पाऊस नियोजित वेळेपेक्षा लवकर अंदमानात दाखल झाला आहे. गेल्या वर्षी १३ मे रोजी मोसमी पाऊस अंदमानात पोहोचला होता, तर यंदा १६ मे रोजी त्याचे आगमन झाले आहे. समुद्री परिस्थिती अनुकूल असल्यामुळे 'एल निनो'च्या संभाव्य परिणामांवर मात करत मोसमी पाऊस वेगाने पुढे सरकत असल्याचे हवामान तज्ज्ञांचे मत आहे.

तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, मान्सून २६ मेपर्यंत केरळमध्ये पोहोचण्याची शक्यता असून, महाराष्ट्रात तो २ ते ५ जूनदरम्यान दाखल होऊ शकतो. दरम्यान, उत्तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात उष्णतेची तीव्र लाट कायम आहे. अकोला, जळगाव आणि नंदुरबार येथे तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत नोंदवले गेले आहे. मात्र, पुढील दोन दिवसांत तापमानात काहीशी घट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

यंदा देशात सरासरीच्या सुमारे ९२ टक्के पावसाचा प्राथमिक अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

## तटकरे, पटेलांबाबत चर्चा हास्यास्पद राष्ट्रीय सचिव आदिक यांचा खुलासा

■ मुंबई

**अजित** पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसबाबत गेले काही दिवस माध्यमांमध्ये सुरू असलेली चर्चा निव्वळ काल्पनिक आणि हास्यास्पद आहे, असा खुलासा आज पक्षाचे राष्ट्रीय सचिव अविनाश आदिक आणि सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला. सुनेत्रा पवार यांच्या आदेशानुसार त्यांनी ही पत्रकार परिषद घेतल्याचे सांगितले.

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची सुत्र सुनेत्रा पवार यांनी हाती घेतल्यापासून प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांना पक्षापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न होत आहे. दोन दिवसांपूर्वी सुनेत्रा पवार यांनी निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रात पक्षाच्या कार्यकारिणीत तटकरे आणि पटेल यांच्या नावासमोर केवळ लोकसभेतील नेते आणि राज्यसभेतील नेते असे नमूद केले होते. त्याचबरोबर पार्थ पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय सरचिटणीसपदी तर जय पवार यांच्यावर खजिनदार पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर पक्षाच्या दिल्लीतील कार्यालयात तटकरे आणि पटेल यांना येण्यास मनाई करण्यात आली आहे, अशा स्वरुपाची चर्चा सुरू होती. त्याबद्दल अविनाश आदिक यांनी खुलासा केला » पान २ वर

## टाटा ट्रस्टची बैठक पुढे ढकलली धर्मादाय आयुक्तांचे निर्देश

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य धर्मादाय आयुक्तांनी टाटा ट्रस्टना आज होणारी विश्वस्त मंडळाची प्रस्तावित बैठक पुढे ढकलण्याचे निर्देश दिले आहेत. सर रतन टाटा ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाच्या रचनेशी संबंधित नियमांचे कथित उल्लंघन झाल्याची चौकशी सुरू असल्याने हा निर्णय घेण्यात आला. ही चौकशी पूर्ण होईपर्यंत ट्रस्टने बैठक घेऊ नये असेही निर्देश दिले आहेत. टाटा ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाला दिलेल्या आदेशात महाराष्ट्र राज्याचे धर्मादाय आयुक्त अमोघ एस. कलोती यांनी म्हटले आहे की, सर रतन टाटा ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाच्या रचनेबाबत करण्यात आलेल्या तक्रारीनंतर निरीक्षकांकडून चौकशीचे आदेश देण्यात आले असून, त्याचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. या प्रकरणात टाटा ट्रस्ट्सचे उपाध्यक्ष वेणू श्रीनिवासन यांनीही धर्मादाय आयुक्तांकडे निवेदन सादर केले होते.

## हा बोत्रे कोण? शरद पवारांच्या प्रश्नाने साखर क्षेत्रात खळबळ

■ दौंड

**दौंड** तालुक्यात सध्या राजकारण, सहकार आणि साखर उद्योगात एका प्रश्नाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी त्यांच्या दौंड दौऱ्यात हा बोत्रे कोण आहे? असा प्रश्न विचारल्यामुळे तालुक्यात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

दौंड तालुक्याच्या माजी आमदार स्वर्गीय उषादेवी कृष्णराव जगदाळे (पाटील) यांच्या निधनानंतर शरद पवार यांनी पत्नी प्रतिभाताईंसह जगदाळे कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांनी उषादेवी यांच्या



सामाजिक आणि राजकीय कार्याचा आढावा घेत कुटुंबियांशी सविस्तर संवाद साधला. मात्र, या चर्चेदरम्यान तालुक्यातील ऊस शेती, साखर कारखाने आणि गुऱ्हाळ व्यवसायाबाबत माहिती घेत असताना त्यांनी अचानक 'हा बोत्रे कोण आहे?' असा प्रश्न विचारल्याची माहिती आहे. पवारांच्या या प्रश्नानंतर उपस्थित कार्यकर्ते आणि स्थानिक नेत्यांमध्ये काही काळ शांतता पसरल्याचे सांगितले जात आहे. बाबूराव बोत्रे पाटील हे राज्यातील उदयोन्मुख साखर उद्योजक म्हणून ओळखले जातात. ते ओंकार शुगर ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष असून, बंद पडलेले अनेक साखर कारखाने पुन्हा सुरू करून त्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिल्याचा दावा केला जातो.

## कुंभमेळा बोधचिन्हावरून वाद शैव-वैष्णव मतभेद उफाळले



**नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण होताच त्यावरून वाद निर्माण झाला आहे. बोधचिन्हात शैव पंथाचे प्रतीक दिसत असले तरी वैष्णव पंथाच्या प्रतीकांचा अभाव असल्याचा आक्षेप धार्मिक प्रतिनिधींनी घेतला आहे.**

■ नाशिक

**मुख्यमंत्री,** दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या उपस्थितीत या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. स्पर्धात्मक प्रक्रियेत ३०६७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. प्रशासनाच्या माहितीनुसार बोधचिन्हात भगवान शंकरांचे त्रिशूळ आणि गोदावरी नदीचे प्रतीकात्मक रूप दर्शविण्यात आले आहे. मात्र, काही महंतांनी या बोधचिन्हावर नाराजी व्यक्त केली आहे. काळाराम मंदिराचे विश्वस्त महंत सुधीरदास पुजारी यांनी वैष्णव परंपरेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी प्रभू श्रीरामांच्या धनुष्यबाणाचा समावेश करावा, अशी मागणी केली आहे. तसेच त्र्यंबकेश्वर येथील आनंद आखाड्याचे महंत शंकरानंद सरस्वती यांनी बोधचिन्ह अधिक सर्वसमावेशक असायला हवे होते, असे मत व्यक्त केले. नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात एकूण १३ आखाडे असून, त्यापैकी १० शैव आणि ३ वैष्णव आखाडे आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व घटकांचा समतोल साधणे प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरत आहे.

## नीट परीक्षेचा तिसरा बळी राजस्थानात युवकाची आत्महत्या

■ जयपूर

**नीट-यूजी** परीक्षा रद्द झाल्याने मानसिक खच्चीकरण झालेले युवक आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहेत. याआधी उत्तर प्रदेश आणि गोव्यामध्ये दोन युवकांनी आत्महत्या करून जीवन संपवले. राजस्थानमध्ये आणखी एका युवकाने हाच मार्ग पत्करला आहे. नीट परीक्षेचा तो तिसरा बळी ठरला आहे. राजस्थानच्या सिकर जिल्ह्यात काल ही घटना उघडकीस आली. सिकर जिल्ह्यातील जलधारी नगर येथे हा मुलगा भाड्याच्या घरात राहत होता. त्याने नीट परीक्षा दिली होती. पेपर चांगले गेल्याने आपल्याला ६५० गुण तरी मिळतील, अशी त्याला अपेक्षा होती. मात्र परीक्षाच रद्द झाल्यामुळे तो अत्यंत निराश झाला होता. शुक्रवारी त्याची एक बहीण ट्युशन क्लासला गेली होती. तर दुसरी बहीण बाथरूममध्ये आंघोळ करत होती. त्यावेळी बहिणीच्या ओढणीच्या सहाय्याने पंख्याला गळफास घेत या युवकाने आत्महत्या केली.

## मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात दिग्विजय पाटील आरोपी क्रमांक २

■ पुणे

**दिवंगत** उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा मुलगा व राज्यसभेचे खासदार पार्थ पवार यांच्याशी संबंधित मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात तपास यंत्रणांनी पुरवणी आरोपपत्र दाखल केले आहे. या आरोपपत्रात अमेडिया कंपनीचे दिग्विजय पाटील यांचा 'आरोपी क्रमांक २' म्हणून समावेश करण्यात आला आहे. याआधी दाखल झालेल्या पहिल्या आरोपपत्रात केवळ शीतल तेजवानी यांचे नाव होते.

या घडामोडींवर प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. दमानिया म्हणाल्या की, या संपूर्ण गैरव्यवहाराचा खरा 'सूत्रधार' पार्थ पवार आहे. गेल्या ३ ते ४ वर्षांपासून या ४० एकर जमिनीवर त्यांची नजर होती. हा व्यवहार पार्थ पवार यांनी केला नसून केवळ दिग्विजय पाटील यांनीच केला आहे, हे कोणालाही पटणारे नाही. या प्रकरणात दिग्विजय पाटील यांचा वाटा केवळ १ टक्का असून, पार्थ पवार हे ९९ टक्के भागीदार आहे. तसेच, दिग्विजय पाटील » पान २ वर

# काटकसरीआधी 'कसरशोध' गरजेचा



**आखातातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी देशातील जनतेला इंधन, सोने, रासायनिक खते आदींबाबत काटकसरीचे आवाहन केले आहे. यामुळे भांडवली बाजारामध्ये प्रचंड पडझड झाली असून, गुंतवणूकदारांचे लाखो कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. दुसरीकडे उद्योगविश्वासह सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. कालपरवापर्यंत देशाच्या अर्थव्यवस्थेचे गोडवे गाणारे पंतप्रधान काटकसरीचा उपाय सुचवत असतील तर निश्चितच संकट गंभीर आहे आणि अर्थव्यवस्था त्याचा सामना करण्यास सक्षम नाहीये असा त्याचा अर्थ होतो. होर्मुजचे संकट हे तात्कालिक कारण आहे. प्रत्यक्षात आर्थिक धोरणातील 'कसर' हे या व्याधीचे मूळ आहे. काटकसरीचे धोरण हे दुधारी शस्त्र ठरू शकते. परदेश प्रवास टाळल्याने विमान कंपन्यांना फटका बसतो, सोने खरेदी बंद केल्याने सराफ व्यवसायातील कर्मचाऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचे संकट उभे राहते. म्हणूनच, या संकटातून बाहेर पडण्यासाठी इतर पर्यायी धोरणांची गरज आहे.**

>>> रविवार विशेष



सीए संतोष घारे

**देशाचे** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन वेळा देशवासीयांना महत्त्वाचे आवाहन करत पेट्रोल आणि डिझेलचा वापर शक्य तितका कमी करण्याचे सुचवले आहे. यासोबतच सोन्याची अनावश्यक खरेदी टाळावी, खाद्यतेलाचा वापर मर्यादित करावा आणि नोकरीपेशा नागरिकांनी 'वर्क फ्रॉम होम'ला प्राधान्य द्यावे, असेही म्हटले आहे. पंतप्रधानांनी ज्या वस्तूंचा उल्लेख केला आहे त्या सर्व वस्तू प्रामुख्याने आयात केल्या जातात आणि त्यासाठी मोठ्या प्रमाणावर परकीय चलन, विशेषतः डॉलर खर्च करावे लागते. दैनंदिन जीवनातील परदेशी वस्तूंवरील अवलंबित्व कमी करून परकीय चलन वाचवणे हा या आवाहनाचा मुख्य उद्देश असल्याचे दिसून येते. तथापि, यामुळे देशातील आर्थिक स्थितीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. पेट्रोल, डिझेल आणि सोन्याची बचत केल्याने परिस्थिती खरोखरच सामान्य होईल का, हा मूळ प्रश्न आहे. भारताकडे पुरेसा परकीय चलन साठा शिल्लक नाही का, आपण दीर्घकाळ इंधन आणि सोने आयात करण्याच्या स्थितीत नाही का, अशी शंका या आवाहनामुळे निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने नेमकी उपलब्धता यावर स्पष्टीकरण देणे आता गरजेचे झाले आहे.

पंतप्रधान मोदींचा आणि सरकारचा उद्देश स्तुत्य असला आणि वर्तणुकीतील बदलाच्या सूचना मोलाच्या असल्या, तरी या सूचना करण्याआधी सरकारी पातळीवरून काही कठोर उपाय करता आले असते. सोन्याच्या आयात शुल्कात केलेली वाढ आधी केली असती तर त्याचा परिणाम आपोआपच सोन्याच्या खरेदीवर झाला असता. भारतीयांकडे असलेल्या ३५,००० टन सोन्याच्या साठ्यापैकी काही अंशाचा जरी योग्य वापर झाला, तर नवीन आयात न करताही सुवर्ण व्यवसाय सुरू राहू शकतो. यासाठी सुरक्षित आणि पारदर्शक संस्थात्मक सोने खरेदीची यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. गेल्या दोन-चार दिवसांत पंतप्रधानांनी, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आणि अन्य काही नेत्यांनी आपल्या लवाजम्यामध्ये कपात केली आहे. ही कपातही पूर्वी करता आली असती. त्यातून जनतेत सकारात्मक संदेश गेला असता. या कपातीमागे जागतिक तेलसंकट आणि डॉलर ही कारणे असल्याचे सांगितले असते तर जनताही या कार्यात स्वखुशीने सहभागी झाली असती.

सेंद्रीय शेतीचा पुरस्कार मोदी सरकार सुरुवातीपासून करत आले आहे. सेंद्रीय उत्पादनांना शहरी वर्गात, आरोग्याबाबत जागरूक असणाऱ्या धनिकांमध्ये, मध्यमवर्गीयांमध्ये मोठी मागणी आहे; पण त्याच्या गुणवत्तेबाबत नेहमीच साशंकता असते. यासाठी प्रमाणिकरण हा उपाय आहे. पण त्यापातळीवर सरकारने ठोस उपाययोजना केलेल्या नाहीत. सेंद्रीय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्याचे धोरण आखल्यास अन्नदाता त्याला सकारात्मक प्रतिसाद देईल. विदेशी पर्यटनाला आळा घालण्यासाठी देशांतर्गत पर्यटनावर सवलती देणाऱ्या योजना आणायला हव्यात. त्याऐवजी परदेशात फिरायला जाऊ नका असे विधान केल्याने पर्यटन व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत. कोविडोत्तर काळात कसाबसा सावरलेला हा उद्योग अनेकांना रोजगार देणारा आहे. त्यावर याचा प्रतिकूल परिणाम झाल्यास, बेरोजगारी वाढल्यास त्याला जबाबदार कोण?

थोडक्यात, व्यवस्थेतील उणिवा दूर करून, धोरणात्मक निर्णय घेऊन, स्वतःच्या वर्तणुकीतून आदर्श घालून देऊन मग जनतेला आवाहन केले असते तर त्याचा परिणामही वेगळा झाला असता आणि प्रभावही चांगला पडला असता. त्याऐवजी २०१६ च्या नोटबंदीप्रमाणे एकाएकी जनतेला काटकसरीचे आवाहन देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने केल्यामुळे अर्थकारणाला त्याचा प्रचंड धक्का बसला आहे. पंतप्रधानांच्या घोषणेनंतर शेअर बाजारामध्ये अक्षरशः विक्रीची त्सुनामी पाहायला मिळाली. चार दिवसांमध्ये ४५०० अंकांनी सेन्सेक्स आणि ८०० हून अधिक अंकांनी निफ्टी घसरला. ११ लाख कोटींहून अधिक रुपयांचा चुराडा झाला. तसेच होर्मुज संकट संपण्याच्या आशेवर बसलेल्या गुंतवणूकदारांना निराशेच्या गर्तेत ढकलले गेले आहे. उद्योगजगतामध्ये, नोकरदारवर्गामध्ये चिंतेचे, भीतीचे वातावरण पसरले आहे. अमेरिकेच्या वाढीव टेरीफमुळे हिरेउद्योगाला मोठा तडाखा दिला होता. आता पंतप्रधानांनी घातलेली साद सराफ उद्योगाला मारक ठरणार आहे. ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिलने (जीजेसी) व्यक्त केलेल्या भीतीनुसार, सोन्याच्या दागिन्यांच्या खरेदीत घट झाल्यास या क्षेत्राशी संबंधित सुमारे १ कोटींहून अधिक लोकांच्या रोजगारावर गदा येऊ शकते. दागिन्यांची मागणी घटल्यास केवळ सराफ व्यावसायिकच नव्हे, तर कारागीर आणि या उद्योगाशी निगडित इतर घटकांचे जीवनमान धोक्यात येण्याची शक्यता आहे.


दुचाकी-चारचाकी वाहनांचा वापर कमी करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य द्या, वर्क फ्रॉम होमचे निर्णय घ्या हे आवाहन देशातील वाहनउद्योगासाठी मारक ठरणारे आहे. या क्षेत्रालाही आखातातील संकटामुळे निर्यातीच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. आता पंतप्रधानांच्या वक्तव्यांमुळे देशांतर्गत मागणीही प्रभावित होऊ शकते.

धक्कातंत्र हा मोदी सरकारचा स्थायीभाव राहिला आहे; पण त्या धक्क्यांचे परिणाम किती दूरगामी होतात, हे नोटबंदीने दाखवून दिले आहे. तरीही यावेळी तोच मार्ग पुन्हा अवलंबावा लागणे यामागे एक मोठे कारण दडलेले आहे. हे कारण म्हणजे अर्थव्यवस्थेबाबतचे गुलाबी चित्र जनतेसमोर मांडताना वाढून ठेवलेले संकट झाकणे. सातत्याने २०४७ साली भारत विकसित राष्ट्र बनणार, जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनणार हा नारा देताना देशातील औद्योगिक उत्पादनाचे वास्तव, देशात होणारी प्रचंड आयात, त्या तुलनेत निर्यातीला आलेल्या मर्यादा, अमेरिकन टेरीफनंतर कोसळलेली निर्यात, याचा चालू खात्यातील तूट वाढण्यावर झालेला परिणाम याविषयी जराही न बोलले गेल्यामुळे जनतेच्या आकांक्षा उंचावत गेल्या. दुसरीकडे खिरापतीसारखा पैसा विविध योजनांच्या माध्यमातून जनतेत वाटून त्याला सक्षमीकरणाचे लेबल लावले गेले. भारताची एकूण व्यापारी तूट ३३३.१९ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. मागील वर्षाच्या २८३.५० अब्ज डॉलरच्या तुलनेत यात मोठी वाढ झाली आहे. सद्यस्थितीत भारतात सुमारे ९८० अब्ज डॉलरच्या वस्तू व सेवांची आयात होते; तर ८६० अब्ज डॉलरची निर्यात होते. २०२५-२६ च्या तिसऱ्या तिमाहीत (ऑक्टोबर-डिसेंबर) देशाची चालू खात्यावरील तूट वाढून १३.२ अब्ज डॉलर (जीडीपीच्या १.३%) झाली आहे. यामुळे रुपयावर दबाव येत चालला असून, डॉलर वधारत चालला आहे. भारताची विदेशी गंगाजळी ६५० अब्ज डॉलरहून अधिक असली तरी आयातीतील प्रचंड वाढ आणि युद्धामुळे निर्यातीला आलेल्या मर्यादा यामुळे ती कमी होण्यास वेळ लागणार नाही. श्रीलंका, पाकिस्तानसारख्या शेजारील देशांमध्ये मागील काळात ही स्थिती दिसून आली आहे. त्यावेळी भारत त्या देशांहून किती वेगळा आहे, भक्कम आहे असे सांगणारे सरकार आज जनतेला विनवण्या का करत आहे, असा सवाल लोक विचारत असून, त्यात गैर काहीच नाही. सरकारी पातळीवर खर्चात कपात करण्यास अमाप संधी आहेत. आमदार-खासदारांचे वेतन, भत्ते, पेन्शन हे वर्षभरासाठी निम्म्यावर आणणे किंवा स्थगित ठेवण्याचा निर्णयही घेतला जाऊ शकतो. पुढील सहा-आठ महिने देशात कसल्याही निवडणुका नसल्याने आता प्रचाराचा झगमगाट करावा लागणार नाहीये. त्यामुळे पंतप्रधानांनी हे आवाहन करताना निवडलेली पाच राज्यांच्या विधानसभा निवडणूक निकालानंतरची वेळ त्यांचे राजकीय कौशल्य दाखवणारी आहे. पण जागतिक पटलावर प्रभाव टाकणारे नेतृत्व जेव्हा एकाएकी जनतेला काटकसर करण्याच्या सूचना करू लागते तेव्हा जनतेच्या मनात अस्वस्थता दाटते. रणांगणावरील लढाईत सेनापतीने शस्त्रे टाकल्यास पराभव अटळ असतो, असे युद्धशास्त्र सांगते. तोच नियम इथेही लागू होतो. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ उदय कोटक यांनीही 'प्रिपेअर फॉर द वर्स्ट' असे विधान केले आहे. अशा प्रकारची धास्ती वाढवणारी विधाने करत राहिल्यास अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होत राहतील. उद्योगांच्या विस्तारापासून सर्वसामान्यांच्या खर्चावर याचे नकारात्मक परिणाम होऊन त्यातून बाजारातील मागणी आक्रसण्याचा धोका आहे. जनतेने काटकसर करू नये असा याचा अर्थ बिलकूल नाही. पण आधीच आर्थिक विवंचनेने पिचलेली ३०-४० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या काटकसर करतच गुजराण करत आहे. परदेश प्रवास, सोनेखरेदी, चारचाकींचा वापर करून इंधनाची उधळपट्टी हे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरचेच आहे. दुर्दैवाने, पंतप्रधानांच्या सूचनांची अंमलबजावणी सुरू झाल्यास हाच वर्ग पीडित ठरण्याची शक्यता आहे.

---

# गरज कठोर परीक्षाप्रणालीची

**यंदाच्या वर्षीची 'नीट'ची परीक्षा पेपरफुटीच्या कारणास्तव रद्द करण्यात आली आहे. जगातील अनेक मोठ्या देशांमध्ये उच्च शिक्षण आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. किरकोळ अडचणी सर्वत्र दिसतात. परंतु भारतासारख्या प्रश्नपत्रिका फुटीच्या धाडसी घटना अमेरिका, युरोप किंवा चीनमध्ये क्वचितच ऐकू येतात. चीनमध्ये 'गाओकाओ' नावाची राष्ट्रीय प्रवेश परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत दरवर्षी तब्बल १.३ ते १.५ कोटी विद्यार्थी सहभागी होतात. २०२५ मध्ये १.३४ कोटी विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती, पण तेथे प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटना जवळजवळ घडत नाहीत. काही किरकोळ अनियमितता दिसतात. मात्र कठोर शिक्षा आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे मोठे गैरप्रकार रोखले जातात. भारतात प्रवेश परीक्षांमध्ये अशी स्थिती कधी निर्माण होणार?**





डॉ. हरवंश चतुर्वेदी
संचालक, बिमटेक

**वैद्यकीय** महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी यंदा ३ मे रोजी 'नीट' (यूजी) परीक्षा घेण्यात आली होती. देशभरातील सुमारे २२.७९ लाख विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग घेतला होता. मात्र प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांनंतर राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात 'एनटीए'ने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीची जबाबदारी केंद्रीय अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात आली असून, लवकरच नव्याने परीक्षा घेण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. या घटनेमुळे वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि 'सीयूईटी'सारख्या राष्ट्रीय प्रवेश परीक्षांच्या विश्वासार्हतेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. देशातील परीक्षा व्यवस्था मजबूत आणि अभेद्य कधी होणार, प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटना पूर्णपणे थांबतील का, विद्यार्थ्यांना वारंवार मानसिक त्रास आणखी किती काळ सहन करावा लागणार असे मूलभूत प्रश्न आता अधिक तीव्रतेने पुढे येत आहेत.

वैद्यकीय प्रवेशासाठीची 'नीट' असो किंवा अभियांत्रिकी प्रवेशासाठीची 'जेईई', या परीक्षांबाबत प्रश्नपत्रिका फुटल्याची घटना समोर आली किंवा तशी अफवाही पसरली तरी युवकांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण होते. कारण या परीक्षा लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा निर्णायक टप्पा असतात. त्यामध्ये घडणारा प्रत्येक गैरप्रकार संपूर्ण प्रवेश परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करणारा ठरतो. ३ मे रोजी देशातील ५५१ शहरांतील आणि विदेशातील १४ शहरांतील सुमारे ५४०० केंद्रांवर परीक्षा देण्यासाठी पोहोचलेल्या लाखो विद्यार्थ्यांची मानसिक अवस्था परीक्षा रद्द करण्याचा निर्णय जाहीर झाल्यानंतर काय झाली असेल, याचा विचार 'एनआयटी'ने केला आहे का?

राजस्थान पोलिसांकडे अशी तक्रार दाखल झाली होती की, 'नीट' परीक्षेच्या तब्बल ४२ तास आधी 'व्हॉटस्‌अ‍ॅप'वर एक तथाकथित 'गेस पेपर' मोठ्या प्रमाणात फिरत होता. या प्रश्नसंचात बहुपर्यायी स्वरूपातील ४१० प्रश्न आणि त्यांची उत्तरे देण्यात आली होती. चौकशीत असे आढळले की, यातील सुमारे १०० प्रश्न प्रत्यक्ष 'नीट' परीक्षेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांशी हुबेहूब जुळत होते. पोलीस तपासातून हेही समोर आले की, या १०० प्रश्नांची उत्तरे व्यवस्थित तयार केली, तर ७२० पैकी जवळपास ६०० गुण सहज मिळू शकत होते.

राजस्थानमधील कोटा शहर आधीच 'जेईई' कोचिंगच्या प्रचंड व्यापारीकरणामुळे आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांमुळे चर्चेत राहिले आहे. मात्र यावेळी 'नीट' प्रश्नपत्रिकेशी संबंधित कथित गेस पेपरचा धागा चुरू आणि सीकरसारख्या शहरांपर्यंत पोहोचला. हा गेस पेपर पाच लाख रुपयांपासून तीस हजार रुपयांपर्यंत विकला जात असल्याची माहिती समोर आली. विशेष म्हणजे, २०२४ मध्येही 'नीट' परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिका फुटल्याचा प्रकार उघड झाला होता. त्यावेळी देशभरात संतापाची लाट उसळली होती आणि हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले होते. २०१७ पूर्वी राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांचे आयोजन 'सीबीएसई', 'एआयसीटीई' आणि 'यूजीसी'सारख्या संस्थांकडून केले जात होते. १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार आणि त्यानंतर १९९२ मध्ये अंमलात आलेल्या कार्यक्रमांतर्गत विविध राष्ट्रीय प्रवेश परीक्षांचे केंद्रीकृत नियोजन करणारी स्वतंत्र राष्ट्रीय संस्था उभारण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार २०१७ मध्ये शिक्षण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'ची स्थापना झाली. २०२४ मधील प्रश्नपत्रिका फुटीच्या वादानंतर 'एनटीए'मध्ये नेतृत्वबदल करण्यात आले आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने परीक्षा अधिक सुरक्षित करण्याचे दावे करण्यात

» पान ५ वर

---

# हंता व्हायरसची भीती कशाला?





डॉ. नानासाहेब थोरात
फेलो ऑफ रॉयल सोसायटी ऑफ मेडिसिन, लंडन

**१९९३ मध्ये,** अमेरिकेतील युटा, कोलोरॅडो, ॲरिझोना आणि न्यू मेक्सिको यांच्या सीमेवरील नेटिव्ह अमेरिकन प्रदेशात एका गूढ साथीच्या रोगाच्या उद्रेकामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. न्यू मेक्सिको राज्यामधील एका तरुण दाम्पत्याच्या रहस्यमय मृत्यूनंतर, तेथील आरोग्य कर्मचाऱ्यांना त्याचे कारण ओळखण्यात अडचणी आल्या, त्याचदरम्यान त्यांना या प्रदेशातील आणखी डझनभर रुग्णांमध्ये समान लक्षणे आढळल्याचे लक्षात आले. नंतर असे आढळून आले की, हंता व्हायरसची एक नवीन प्रजाती उदयास आली होती. तिला सिन नोम्ब्रे व्हायरस (स्पॅनिश भाषेत नाव नसलेला) असे नाव देण्यात आले आणि यामुळे अखेरीस १३ लोकांचा मृत्यू झाला. हा उद्रेक आता १९९३ फोर कॉर्नर्स उद्रेक म्हणून ओळखला जातो आणि तिथूनच हंता व्हायरसच्या उत्क्रांतीबद्दल जागतिक तज्ज्ञांना चिंता वाढली.

हंता व्हायरस हा विषाणूंचा एक वंश आहे, जो मानवांमध्ये रोग निर्माण करू शकतो. हे विषाणू संक्रमित उंदरांच्या उत्सर्जनातून तयार होणाऱ्या सूक्ष्म कणांच्या श्वसनाद्वारे पसरतात आणि रक्तस्त्रावजन्य तसेच फुफ्फुसांशी संबंधित विविध लक्षणे निर्माण करतात. हंतान ऑर्थोहंता व्हायरस आणि डोब्रावा-बेलग्रेड ऑर्थो हंता व्हायरस यांसारख्या काही प्रजाती जगातील विविध भागांत अनेक शतकांपासून अस्तित्वात असण्याची शक्यता आहे, तर सिन नोम्ब्रे व्हायरस आणि अँडीज व्हायरस या प्रजाती १९९० च्या दशकात वेगळ्या ओळखल्या गेल्या.

१९९६ मध्ये, पहिल्यांदाच अर्जेंटिनामध्ये झालेल्या उद्रेकाने व्यक्तीकडून व्यक्तीकडे होणाऱ्या संक्रमणाची पहिली घटना नोंदवली. जुन्या आणि नव्या जगातील विषाणूंमधील हा फरक आजारपण, मृत्यूदर आणि महामारी बनण्याच्या शक्यतेच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. हंता व्हायरसचा मानवाकडून मानवाकडे प्रसार फारच दुर्मीळ असला, तरीही साथीचे उद्रेक सार्वजनिक आरोग्यासाठी चिंतेचा विषय राहतात. विशेषतः घरगुती संसर्ग आणि रुग्णालयांमधील प्रसाराच्या धोक्यामुळे, जिथे संक्रमण रुग्णालये आणि दवाखान्यांमध्ये पसरते.

एप्रिल २०२६ मध्ये, डच क्रूझ जहाज एमव्ही हौंडीजवर अँडीज व्हायरसमुळे झालेल्या हंता व्हायरस संसर्गाचा उद्रेक ओळखण्यात आला आणि जगाचे लक्ष पुन्हा या विषाणूकडे गेले. १३ मेपर्यंत या उद्रेकाशी थेट संबंधित आठ प्रकरणे, एक निष्कर्ष न लागलेले प्रकरण आणि दोन संशयित प्रकरणे नोंदवली गेली आहेत. हे जहाज १ एप्रिल रोजी अर्जेंटिनातील उशुआया येथून निघाले होते. ११ एप्रिल रोजी एका प्रवाशाचा या विषाणूमुळे जहाजावर मृत्यू झाला. त्याचा मृतदेह २४ एप्रिल रोजी सेंट हेलेना येथे किनाऱ्यावर नेण्यात आला. तिथे ३० प्रवासी उतरले होते. त्यामध्येत्यांची पत्नीही होती, जिचा दोन दिवसांनी जोहान्सबर्गमधील रुग्णालयात मृत्यू झाला. जहाजावर आणखी दोन प्रवाशांचा अनुक्रमे २६ आणि २८ एप्रिल रोजी मृत्यू झाला. एका ब्रिटिश प्रवाशाला २ मे रोजी गंभीर पण स्थिर अवस्थेत उपचारासाठी जोहान्सबर्ग येथे पाठविण्यात आले. जागतिक आरोग्य अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, यावर्षी अर्जेंटिनामध्ये हंता व्हायरसची १०० हून अधिक प्रकरणे आणि ३० पेक्षा जास्त मृत्यू नोंदवले गेले आहेत.

न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडीसीनमध्ये २०२० साली प्रकाशित झालेल्या एका संशोधनानुसार, ज्यांच्या शरीरात विषाणूचे प्रमाण जास्त होते, अशा रुग्णांकडून इतर लोकांमध्ये विषाणू पसरण्याची शक्यता अधिक होती. तसेच, मोठ्या सामाजिक कार्यक्रमांमध्ये किंवा संक्रमित व्यक्तीशी दीर्घकाळ आणि जवळचा संपर्क आल्यास संक्रमण होण्याची शक्यता जास्त असल्याचे आढळले. या विषाणूमुळे होणाऱ्या आजाराची लक्षणे इतर विषाणूजन्य आजारांसारखीच असतात: ताप, कोरडा खोकला, अंगदुखी, डोकेदुखी आणि अतिसार. जर संसर्ग पुढे वाढला, तर श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो आणि फुफ्फुसांमध्ये द्रव साचू शकतो. हा विषाणू सर्वाधिक वेळा हवेमार्फत पसरतो. त्यामुळे संसर्ग रोखताना ही गोष्ट लक्षात ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जर एखादी व्यक्ती उंदरांच्या विष्ठा असलेल्या भागात असेल, तर तो भाग ओला करणे ज्यामुळे हवेत उडणारे सूक्ष्म कण कमी होतात. विशेषतः जेव्हा साफसफाईदरम्यान विषाणू जास्त पसरण्याची शक्यता जास्त असते. हे काम घरगुती निर्जंतुकीकरण द्रव्ये, ब्लीच किंवा अल्कोहोल वापरून करता येते. तसेच त्या भागात हवा खेळती ठेवणेही महत्त्वाचे आहे. खिडक्या आणि दरवाजे उघडून ताजी हवा फिरू देणे उपयुक्त ठरते. सध्यातरी यावरती कोणतेही अधिकृत उपचार नसल्यामुळे सार्वजनिक आरोग्य जागरूकता मोहिमा, लवकर निदान, वेळेवर उपचार सुनिश्चित करण्यावर आणि संसर्गाच्या संपर्काचा धोका कमी करण्यावर केंद्रित असावयात असे जागतिक आरोग्य संघटनेचे मत आहे.

प्रतिबंधात्मक उपायांमध्ये कामाशी संबंधित तसेच इको टुरिझमशी संबंधित जोखमींचा विचार केला पाहिजे. संक्रमण प्रतिबंध आणि नियंत्रण उपायांवर भर देणे तसेच उंदरांवर नियंत्रण ठेवण्याच्या रणनीतींचा समावेश करणे आवश्यक आहे.

**जगाला हंता व्हायरसचा इतिहास १९५० च्या कोरियन युद्धादरम्यान ओळखल्या गेलेल्या साथीच्या उद्रेकांपासून माहीत झाला. १९७८ मध्ये, कोरियन हेमोरेजिक फीव्हरला कारणीभूत विषाणू दक्षिण कोरियातील हंतान नदीजवळ आढळलेल्या ॲपोडिमस ॲग्रारियस या संक्रमित लहान शेतउंदरामधून वेगळा करण्यात आला. त्या नदीच्या नावावरून या विषाणूला हंता म्हणजेच हंतान व्हायरस असे नाव देण्यात आले. या विषाणूचा शोध कोरियन युद्धानंतर (१९५१-१९५३) सुरू झालेल्या वैज्ञानिक संशोधनांमधून लागला. कारण त्या काळात संयुक्त राष्ट्रांच्या सैन्यात कोरियन हेमोरेजिक फीव्हरची ३००० हून अधिक प्रकरणे नोंदवली गेली होती.**

## १९९३ ते २०२३! विषाणू उद्रेक

**अमेरिका:** अंदाजे ८९० एकूण प्रकरणे. हा अत्यंत दुर्मीळ आजार असून, देशभरात दरवर्षी सुमारे २०–३० प्रकरणे नोंदवली जातात.

**कॅनडा :** अंदाजे १५० एकूण प्रकरणे. मुख्यत: पश्चिमेकडील प्रांतांमध्ये आढळतात.

**दक्षिण अमेरिका:** दरवर्षी २००–३०० प्रकरणे. ब्राझील आणि अर्जेंटिना यांसारख्या प्रदेशांमध्ये हा आजार स्थानिक आहे; येथे मृत्यूदर तुलनेने जास्त असतो.

**चीन आणि पूर्व आशिया:** दरवर्षी १००,००० हून अधिक प्रकरणे. जगातील सर्वाधिक भार या प्रदेशावर आहे आणि जागतिक संसर्गांचा बहुतांश भाग येथे आढळतो.

**युरोप:** दरवर्षी दोन ते चार हजार प्रकरणे आढळतात. मध्य आणि उत्तर युरोपमध्ये लहान उद्रेकांचे समूह दिसतात, जे उंदरांच्या लोकसंख्येच्या चक्रांनुसार बदलतात.

**दक्षिण-पूर्व आशिया आणि भारत :** अधूनमधून आढळणारी प्रकरणे. उंदरांच्या लोकसंख्येमध्ये विषाणू उपस्थित असला तरी मानवांमध्ये नोंदवलेली प्रकरणे पूर्व आशियाच्या तुलनेत फारच कमी आहेत.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# अधिक सात्त्विकतेचा अधिक महिना

भारतीय कालगणनेने आपले स्वतंत्र महत्त्व प्राचीन काळापासून टिकवून ठेवले आहे. जगभरामध्ये वेगवेगळ्या प्रकारची कालगणना होत असते. परंतु भारतामध्ये सूर्य आणि चंद्राच्या भ्रमणाला अनुकूल अशा प्रकारची कालगणना प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. या कालगणनेत वर्ष, महिना, आठवडा आणि दिवसाचे विभाग तर केलेले आहेतच. परंतु वर्षभरातून येणारे उत्तरायण आणि दक्षिणायन हे सुद्धा सूर्य सिद्धांताप्रमाणे वेगळ्या प्रकारे लक्षात घेता येते. एकूणच काल या संकल्पनेकडे अधिक डोळसपणे पाहण्याची आणि मनुष्यजीवन विविध अनुभवांनी समृद्ध करण्याची व्यवस्थाही भारतीय कालगणनेचे मोठे वैशिष्ट्य ठरते. या वैशिष्ट्यापैकी एक वैशिष्ट्य म्हणजे दर तीन वर्षांनंतर येणारा अधिक महिना प्रत्येक वर्षी अकरा दिवस भरतील एवढ्या काळाचा संचय होतो आणि तीन वर्षांनी जास्त होणारे तेहतीस दिवस अधिक मास किंवा मलमास म्हणून ओळखले जातात. याच महिन्याला पुरुषोत्तम मासही म्हटले गेले आहे. कालगणनेची ही प्राचीन पद्धती आहे. ज्यातून सामाजिक स्तरावर सकारात्मक मानसिकता वाढवण्याचाच मूळ उद्देश आहे हे विशेषत्वाने लक्षात येते. पुरुषोत्तम हे भगवान विष्णू किंवा कृष्णाचे दुसरे नाव आहे. या महिन्यात विष्णू किंवा कृष्ण उपासनेला अधिक महत्त्व दिले गेले आहे. खरे तर त्याचा दुसरा मतितार्थ असा की, व्यक्तिला सुध्दा आपल्या गुणसंवर्धनातून पुरुषोत्तम होता येते. उत्तम पुरुष म्हणून आवश्यक ती सात्त्विक मानसिकता वाढविण्याचा हा अधिक महिना एक निमित्त ठरते. 'अधिकस्य अधिक फलम' अशा शब्दांमध्ये या महिन्याचे वर्णन करून आध्यात्मिक किंवा भक्तीच्या माध्यमातून या काळात सामूहिकरित्या म्हणजे सलग ३३ दिवस साधना आणि उपासनेची एक पर्वणीच उपलब्ध होत असते. व्यक्तिगत स्तरावर आपापल्या श्रद्धा किंवा परमेश्वराविषयीची अनन्य शरणागत भावना नेहमीपेक्षा थोड्या अधिक प्रमाणात व्यक्त करता येते. म्हणूनच रोज केल्या जाणाऱ्या उपासना किंवा साधनेपेक्षा या काळात त्याचे प्रमाण वाढवावे. अधिक प्रमाणात आणि अधिक एकाग्रतेने ही उपासना घडून येत असल्याने त्याचे एक मानसिक समाधान प्राप्त करता येते.

**अधिक आणि एकाग्र साधना**

शेकडो वर्षांपासूनची ही अधिक महिन्याचे महत्त्व लक्षात आणून देणारी परंपरा कालगणनेबरोबरच अधिक सात्त्विकता आणि सकारात्मकतेला सहजपणे वृद्धिंगत करते. आपल्याकडे दरवर्षी चातुर्मासाचा कालावधीसुद्धा अशाच सलग आणि एकाग्र उपासनेसाठी सांगितला गेलेला आहे. परंतु या काळात प्रत्येकजण आपापल्या उपासनेप्रमाणे किंवा उपास्य देवतेप्रमाणे साधना उपासना करत असतो. मात्र अधिक मासामध्ये प्रामुख्याने विष्णू किंवा कृष्णाचीच उपासना विशेषत्वाने सांगितले गेले आहे. ज्यांची या सगळ्या गोष्टींवर श्रद्धा आणि निष्ठा आहे तेच लोक या कालावधीचा अतिशय जाणीवपूर्वक उपयोग करून घेतात. मग अगदी नेहमीच्या नामस्मरणापासून ते तीर्थस्थानांना भेटी देण्यापर्यंत किंवा नेहमीपेक्षा अधिक दानधर्म करण्यापासून ते महिनाभर विशेष उपक्रम राबवण्यापर्यंत हा अधिक महिना विचारात घेतला जातो. साधारणपणे आध्यात्मिक स्तरावरची सक्रियता या काळात वाढवणे आणि त्याची अनुभूती घेण्याची संधी अनेकजण साधत असतात. या काळात दीपदानाला विशेष महत्त्व दिलेले आहे. दीप हे तेजाचे तर प्रतीक असतेच. परंतु अंधार दूर करून आत्मविश्वासाच्या यशाच्या किंवा आध्यात्मिक साधना अधिक प्रकाशमान करता येऊ शकते. भारतात आजपासून सुरू होत असलेल्या या अधिक महिन्याच्यानिमित्ताने अनेक तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी नेहमीपेक्षा अधिक गर्दी होईल. स्नानदान पुण्य पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न होईल. यात प्रामुख्याने प्रत्येकाला मिळणारे मानसिक समाधान हा भाग तर महत्त्वाचा आहेच. परंतु व्यापक अर्थाने विचार केला तर व्यक्ती आणि समाजातली सभ्यता, सात्त्विकता आणि सकारात्मक मानसिकता जपण्याचे किंवा वाढवण्याचे हे एक महत्त्वपूर्ण औचित्य आहे हे विसरून चालणार नाही. खरे तर भारतीय संस्कृतीची जाणीव करून जी काही सण व्रत किंवा उत्सवांची परंपरा निर्माण केली आहे त्यामागेसुद्धा श्रद्धा आणि भक्तीच्या माध्यमातून व्यक्तीला आणि समाजाला बौद्धिकदृष्ट्या समृद्ध ठेवण्याचाच हेतू दिसून येतो.

**ईश्वरीय शक्तीची अनुभूती**

बदलत्या काळातही व्यक्तीला सुखापेक्षा हा मानसिक आनंद महत्त्वाचा वाटत असतो. मग ती महाराष्ट्रातली पंढरीची वारी असो किंवा जगन्नाथपुरीची यात्रा असो. एवढेच नव्हे तर विशिष्ट कालावधीनंतर येणारा कुंभमेळा असो. या सर्वांमध्ये संपूर्ण सृष्टीचे संचालन करणाऱ्या ईश्वरीय शक्तीचाच शोध घेण्याचा प्रयत्न होतो. ज्याची जशी श्रद्धा, भक्ती आणि साधनेची पराकाष्ठा असते तसा त्या व्यक्तीला अनुभव येत असतो. रोज केले जाणारे नामस्मरण चांगल्या ग्रंथांचे वाचन, ज्ञानेश्वरी, तुकोबाची गाथा, एकनाथी भागवत, दासबोध, श्रीमद्भागवताचे पारायण किंवा भगवद्गीता विष्णूसहस्त्रनाम यासारख्या ग्रंथांच्या वाचनातून मिळणारी मनशांती शब्दांत व्यक्त करण्यापलिकडची असते. प्रत्येकजण आपापल्या स्तरावर त्याची अनुभूती घेतो. आणि आपली उपासना, भक्ती अधिकाधिक वाढवण्याचा प्रयत्न करीत असतो. अत्यंत कठीण प्रसंगांमधून तारुन नेणारी किंवा येणाऱ्या संकटांचा सामना करण्याची शक्ती देणारी ही साधना, उपासनाच प्रत्येकाला मोठा आधार वाटत असते. अधिक महिन्याचे पौराणिक महत्त्व वेगवेगळ्या प्रकारे सांगितले गेले आहे. परंतु कोणत्याही प्रकारची उपासना, साधना,, नेहमीपेक्षा अधिक प्रमाणात करता येणे आणि त्याचाही मनसोक्त आनंद घेऊन आपल्या जीवनाची समृद्धता विकसित करणे यातून सहज शक्य होते. या काळात केले जाणारे दानधर्म म्हणजेच आपल्यातला सत्प्रवृत्त माणूस जागा ठेवण्याचा अतिशय सूक्ष्म प्रयत्न असतो. भगवद्गीतेमध्ये श्रीकृष्णाने

*मय्या वेश्य मनो ये मां, नित्ययुक्ता उपासते।*
*श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः।*

म्हणजेच जो माझी एकाग्रतेने निरंतर भक्ती करतो. जे परमश्रद्धेने माझी उपासना करतात. ते सर्वश्रेष्ठ भक्त मानले जातात. अशा प्रकारचे ठोस आश्वासन कृष्णाने दिलेले असल्यानेच त्यालाच शरण जाण्याचा आणि अधिक पुण्य प्राप्त करण्याचा कालगणनेतून आलेला हा अधिक महिन्याचा योग आहे.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

ज्ञानातून विचार घडतो. विचारातून बदल घडतो आणि बदलातूनच नव भविष्य निर्माण होते.

## पंचांग

**रविवार, १७ मे २०२६**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**



* अधिक ज्येष्ठ शुक्ल प्रतिपदा
* नक्षत्र : कृत्तिका
-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० वृषभ

रवी उदय- ०६-०५
रवी अस्त- १९-०५

**अधिक ज्येष्ठ मासारंभ, पुरुषोत्तम मासारंभ, गंगादशहरारंभ, करिदिन, नूतन चंद्रदर्शन, जागतिक दूरसंचार दिन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१ ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### ढाबा स्टाईल मोगलाई चिकन



★ **साहित्य :** अर्धा किलो चिकन, ३ चमचे काळीमिरी पूड, ६- ७ लवंग, २ काळ्या मोठ्या वेलची, २ काळी वेलची, २ हिरवी वेलची, १ इंच दालचिनीचा तुकडा, अर्धा जायफळ, २ तमालपत्र, ४ ते ५ सुक्या लाल मिरच्या, २ चमचे तूप, २ चमचे तेल, १ जावित्री, दोन मोठे चिरलेले कांदे, हिरव्या मिरच्या, आलं, लसूण पेस्ट, गरम मसाला, १ कप दही, अर्धा कप कुरकुरीत तळलेले कांदे.

★ **कृती :** सर्वप्रथम चिकन स्वच्छ धुवून त्यावर दही लावून ठेवा. यानंतर काळी मिरी, जावित्री, हिरवी वेलची, दालचिनीचा तुकडा असे सर्व गरम मसाले थोडे ठेचून घ्या. आता एका कुकर किंवा खोलगट कढईत तेल आणि तूप गरम करा. तेल-तूप गरम होताच त्यात हे ठेचलेले मसाले टाकून ४ ते ५ सेकंद परतत राहा. यानंतर कांदा टाकून तोही ३ ते ४ मिनिटांपर्यंत शिजवा. यात आता हिरव्या मिरच्या, आलं, लसूण पेस्ट टाका. यानंतर चिकन टाकून ते ६ ते ७ मिनिटे शिजू द्या. पुढे मीठ आणि कुरकुरीत कांदे त्यात टाका. यानंतर १/४ कप पाणी टाका आणि चांगले प्रकारे ढवळून शिजवू द्या. कुकरचे झाकण बंद करून ते मंद आचेवर शिजवा, (कुकरची शिट्टी होऊ देऊ नका) अंदाजे शिजले असेल असे लक्षात येताच कुकरखालचा गॅस बंद करा. कुकर थंड होताच उघडा. अशाप्रकारे मोगलाई चिकन खाण्यासाठी तयार आहे.




# पंजाब किंग्ससमोर आज 'करो या मरो'ची स्थिती

## बंगळुरु संघाला पराभूत करावेच लागणार



**धर्मशालाच्या हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर उद्या होणाऱ्या आयपीएलच्या ६२ व्या सामन्यात पंजाब किंग्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात जोरदार लढत होणार आहे. बंगळुरुने आयपीएलच्या प्लेऑफमध्ये आपली जागा पक्की केली असून, बंगळुरु गुणतालिकेत आपले पहिले स्थान भक्कम करण्यासाठी मैदानावर उतरणार आहे. तर पंजाबला सलग पाच सामन्यांत पराभव झाल्यामुळे प्लेऑफमध्ये अद्याप प्रवेश मिळवता आलेला नाही. प्लेऑफमध्ये स्थान मिळवण्यासाठी पंजाबला उद्याचा आणि लखनौविरुद्ध २३ मे रोजी होणारा सामना कोणत्याही परिस्थितीत जिंकावाच लागणार आहे.**

■ धर्मशाला

**आयपीएलच्या** या हंगामात बंगळुरुने १२ सामने खेळले आहेत. त्यातील ८ सामन्यांत विजय मिळवला, तर ४ सामन्यांत पराभव पत्करावा लागला. त्यामुळे बंगळुरु गुणतालिकेत १६ गुणांसह अव्वल स्थानावर आहे. पंजाबनेही आतापर्यंत १२ सामन्यांत नशीब आजमावले आहे. त्यातील ६ सामन्यांत विजय नोंदवला आहे, तर ५ सामन्यांत पराभव पत्करला आहे. एक सामना पावसामुळे रद्द झाला. त्यामुळे पंजाब १३ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. पंजाबला आपले क्षेत्ररक्षण सुधारावे लागेल आणि गोलंदाजीत बदल करावा लागेल. विराट कोहलीच्या उत्कृष्ट फॉर्ममुळे बंगळुरु सातत्याने चांगली कामगिरी करत आहे. गेल्या २ सामन्यांमध्ये पंजाबला शेवटच्या ५ षटकांत आपल्या गोलंदाजीवर नियंत्रण ठेवण्यात अपयश आले. या फॉरमॅटच्या इतिहासात २०० पेक्षा जास्त धावा केल्यानंतर सर्वाधिक सामने (१०) गमावण्याचा विक्रम पंजाब किंग्सच्या नावावर आहे. बार्टलेट आणि जॅनसेनसारखे गोलंदाज संपूर्ण स्पर्धेत महागडे ठरले आहेत, ज्यामुळे पंजाबला आपल्या गोलंदाजीत बदल करण्यास भाग पडले आहे.

मागील सामन्यात अर्शदीपने किफायतशीर गोलंदाजी केली, तर अझमतुल्ला उमरझाईने या हंगामातील आपल्या पहिल्याच सामन्यात फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. पंजाबची फलंदाजी चांगली झालेली आहे. मात्र गेल्या काही सामन्यांमध्ये त्यांना अपेक्षेप्रमाणे कामगिरी करता आलेली नाही. प्रियांश आणि प्रभसिमरन यांना संघाला एक भक्कम सुरुवात करून द्यावी लागेल. कर्णधार श्रेयस आणि कॉनोली यांनाही मोठी खेळी करावी लागेल.

दरम्यान, बंगळूरूचा संघ खूप संघटित दिसत आहे. भुवनेश्वर आणि हेझलवूड यांच्यासह पंजाबचे वेगवान गोलंदाज येथील परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेऊ शकतात.

## फुटबॉल विश्वचषकासाठी बेल्जियम संघाची घोषणा

**ब्रसेल्स-** अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिकोमध्ये १२ जूनपासून सुरू होणाऱ्या फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेसाठी बेल्जियमने २६ सदस्यीय संघांची घोषणा केली. रियल माद्रिदचे गोलकीपर थिबो कोर्टुआ आणि मिडफिल्डर केविन डी ब्रुईन संघाची कमान सांभाळणार आहे. बेल्जियमला आतापर्यंत विश्वचषक जिंकता आलेला नाही.

बेल्जियमला ग्रुप-जी मध्ये इजिप्त, इराण आणि न्यूझीलंडसोबत ठेवण्यात आले आहे. संघ १६ जून रोजी इजिप्तविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे. २१ वर्षीय फॉरवर्ड मटियास फर्नांडीज-पार्डो याला पहिल्यांदा बेल्जियमच्या राष्ट्रीय संघात स्थान मिळाले आहे. त्याच्या निवडीवर बऱ्याच काळापासून सस्पेन्स होता. कारण त्याने गेल्या वर्षी स्पॅनिश नागरिकत्व घेतले.

## थायलंड बॅडमिंटन ओपन स्पर्धा सात्त्विक-चिराग अंतिम फेरीत

■ बँकॉक

**भारतीय** पुरुष दुहेरी जोडी सात्त्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी शानदार कामगिरी करत थायलंड ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. या स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या सामन्यात सात्त्विक-चिरागने मलेशियाच्या गोह झी फेई आणि नूर इझ्झुद्दीन यांचा पराभव केला. जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या सात्त्विक-चिराग जोडीने २०१९ आणि २०२४ मध्ये येथे विजेतेपद पटकावले होते.

या भारतीय जोडीने उपांत्य फेरीत मलेशियन जोडीविरुद्ध दमदार कामगिरी केली आणि ८२ मिनिटे चाललेल्या सामन्यात १९-२१, २२-२०, २१-१६ असा विजय मिळवला. सात्त्विक-चिराग जोडी तिसऱ्यांदा थायलंड ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचली. गोह झी फेई आणि नूर इझ्झुद्दीन यांच्याविरुद्ध सात्त्विक-चिराग जोडीचा रेकॉर्ड ८-२ असा आहे. मात्र, गेल्या वर्षी इंडिया ओपन सुपर ७५० स्पर्धेत याच मलेशियन जोडीने सात्त्विक-चिरागला पराभूत केले होते.

## व्हॉलीबॉल स्पर्धेत मुंबई, पुणे आणि नाशिक, नागपूरची विजयी हॅट्ट्रिक

■ बदलापूर

**क्रीडा** व युवक सेवा संचालनालय, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत यजमान मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर संघांनी विजयी हॅट्ट्रिकसह उपांत्य फेरीत मजल मारली.

बदलापूर जिमखाना मैदानावर विद्युत प्रकाशझोतात रंगलेल्या या स्पर्धेत २१ वर्षांखालील मुलीच्या गटांत मुंबईने सलग तिसरा विजय संपादन केला. शेवटच्या साखळी लढतीत मुंबईने लातूर विभागाचा २५-१४, २५-११ गुणांनी पराभव करत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. उपांत्य फेरीतील गटात अव्वल ठरलेल्या मुंबईची नागपूरशी लढत रंगणार आहे. या गटातील दुसरी उपांत्य लढत नाशिक विरूध्द पुणे विभागात होईल.

## महापौर केसरीचा मानकरी मुंताजीर ठरला

■ मुंबई

**धाराशिवच्या** मुंताजीर सरनौबतने इम्रान मुजावरला चितपट करून ३२ व्या मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धेच्या गदेवर आपल्या नावाची मोहर उमटवली. या यशाबद्दल मुंताजीरला एक लाख रुपयांचे बक्षीस देऊन गौरवण्यात आले.

मुंबई महापालिका आणि मुंबई शहर तालीम संघाने ३२ व्या मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धेची घोषणा केल्यावर माटुंग्याला लालबहादुर शास्त्री शाळेचे शिवछत्रपती पुरस्कार विजेते वस्ताद नामदेव बडरे यांनी मोठ्या आत्मविश्वासाने मुंताजीरची प्रवेशिका दिली होती. मुंताजीरनेही आपल्या वस्तादांचा



विश्वास सार्थ ठरवताना अवघ्या दीड मिनिटात इम्रान मुजावरला चितपट करत मुंबई महापौर केसरी किताब आपल्या नावे केला. मुंताजीर आणि इम्रान यांच्यातील कुस्ती तुल्यबळ होईल अशी अपेक्षा होती.

## मुंबई महापौर कॅरम चषक स्पर्धा कमलेश, चेतनची विजयी सलामी

■ मुंबई

**मुंबई** डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन आयोजित आणि लोकमान्य मंडळ यांच्या सहकार्याने लोकमान्य सभागृह, माटुंगा (पश्चिम) येथे आजपासून सुरू झालेल्या २३ व्या मुंबई महापौर चषक जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेतील पुरुष एकेरी पहिल्या फेरीत कमलेश राठोडने अमोल पांचाळवर २५-९, २५-३ आणि चेतन कोळीने सूर्यकांत मोरेवर ११-१५, २५-९, २५-१२ असा विजय मिळवला.

बाबुलाल श्रीमलने रवींद्र पेडणेकरवर २५-४, १०-२५, २५-१८, सुपेश कामतेकरने रुपेश जळगावकरवर ८-२१, १७-१२, २२-९, जितेंद्र काळेने चंद्रकांत पेडामकरवर २५-१०, २५-४, निशार शेखने शांतीलाल जितियावर २५-१४-१६-१२, दीपक सावंतने समीर फुलपगारवर २५-५-२५-१० असा विजय मिळवला, महिला एकेरी पहिल्या फेरीत ऋता रेडकरने मयुरी कापरेकरवर १५-१, १७-१९, २५-९, अनुपमा केदारने समिधा जाधववर २२-७, २५-७, प्राजक्ता नारायणकरने मैत्रेयी गोगटेवर २१-८, २५-१० असा विजय मिळवला. मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप मयेकर व लोकमान्य नगर सोसायटीचे अध्यक्ष नविन जोशी यांनी कॅरमचा एक डाव खेळून स्पर्धेचे उद्घाटन केले.

## भारतीय महिला संघाने महाकालचे दर्शन घेतले

**उज्जैन-** महिला टी-२० विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर भारतीय महिला संघाने आज उज्जैनच्या बाबा महाकाल मंदिरात जाऊन विजयासाठी प्रार्थना केली. या संघाने पहाटे भस्म आरतीत सहभाग घेतला. भारतीय संघ काल संध्याकाळी दोन विमानांनी इंदूरला दाखल झाले आणि पहाटे महाकालेश्वरला भेट देण्यासाठी उज्जैनला रवाना झाले. मध्य प्रदेश क्रिकेट असोसिएशनच्या (एमपीसीए) सहसचिव आणि भारताच्या माजी खेळाडू अरुंधती किरकिरे यांनी सांगितले की, शेफाली वर्मा, रेणुका सिंग ठाकूर, श्रेयंका पाटील, क्रांती गौर, भारती फूलमळी, अरुंधती रेड्डी, हरमनप्रीत कौर आणि दीप्ती शर्मा बाबा महाकाल यांच्या दर्शनासाठी उज्जैनला आल्या होत्या.



## आरबीआय व्यावसायिक खो-खो स्पर्धा रेल्वेचे दोन्ही संघ उपांत्य फेरीत

■ मुंबई

**मुंबई** खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) स्पोर्ट्स क्लब आयोजित पहिली व्यावसायिक निमंत्रित खो-खो स्पर्धा परळच्या लाल मैदानावरील कै. विवेकानंद पैगावकर क्रीडानगरीत दिमाखात सुरू आहे. आजच्या व्यावसायिक गटाच्या पहिल्या उपउपांत्य फेरीत पश्चिम रेल्वेने बँक ऑफ इंडिया संघाचा ११-९ (मध्यंतर ९-४) असा ७.२० मि. राखून २ गुणांनी पराभव करत दमदार विजय मिळवला. उपांत्य फेरीत पश्चिम रेल्वे आणि महाराष्ट्र पोस्ट भिडणार आहे, तर मध्य रेल्वे रचना नोटरी वर्क्सवर लढत देणार आहे.

सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करून पश्चिम रेल्वे संघाने सामन्यावर पकड मजबूत ठेवली. विजयी संघाकडून निखिल सोडिये (२.३०, नाबाद २.३० मि. संरक्षण व २ गुण), आदित्य गणपुले (२.५० मि. संरक्षण व २ गुण), वृषभ वाघ (नाबाद १, ३ मि. संरक्षण), महेश शिंदे (१, १.२० मि. संरक्षण व १ गुण) आणि अभय रत्नाकर (१ मि. संरक्षण व ५ गुण) यांनी शानदार खेळ करत संघाला विजय मिळवून दिला. दुसऱ्या उपउपांत्य फेरीत मध्य रेल्वेने महावितरण कंपनीचा १९-१२ (मध्यंतर १०-६) असा ७ गुणांनी पराभव करून उपांत्य फेरीत शानदार प्रवेश केला. मध्य रेल्वेने सुरुवातीपासूनच सामन्यावर वर्चस्व राखत प्रतिस्पर्ध्यांना पुनरागमनाची संधी दिली नाही. विजयी संघाकडून अर्णव पाटणकर (१.४० मि. संरक्षण व ४ गुण), शुभम थोरात (१.४० मि. संरक्षण व ३ गुण), विजय हजारे (२ मि. संरक्षण), मिलिंद चावरेकर (१ मि. संरक्षण व ४ गुण), सौरभ घाडगे (नाबाद १ मि. संरक्षण व २ गुण) आणि गणेश बोरकर (२.१० मि. संरक्षण) यांनी संघाचा विजय सुकर केला.

# राजकोटमध्ये १२ मंदिरे जमीनदोस्त! स्थानिकांचा भाजपावर संताप

■ राजकोट



**गुजरातमधील** राजकोट येथे सुमारे १२ मंदिरे एकाच वेळी बुलडोझरने पाडण्यात आल्याने वातावरण तापले आहे. मावडी मेन रोड परिसरात स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले असून त्यांनी प्रशासन आणि भाजपाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

स्थानिक नागरिकांनी आरोप केला की, भाजपाने धर्म आणि हिंदुत्वाच्या नावावर मते मागून सत्ता मिळवली. पण आता मंदिरांवरच कारवाई केली जात आहे. हिंदूंनी मोठ्या संख्येने मतदान केल्यामुळेच भाजपा सत्तेत आली. हिंदूंनाच नाराज केले तर सत्ता गमावण्यास वेळ लागणार नाही, असा इशारा आंदोलकांनी दिला. राजकोट महानगरपालिकेने स्थानिकांचा विरोध टाळण्यासाठी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास अतिक्रमण हटवण्याची कारवाई सुरू केली. पहाटे पाच वाजेपर्यंत ही मोहीम सुरू होती. कारवाईदरम्यान अग्निशमन दल, पीजीव्हीसीएल, दक्षता विभाग आणि स्थानिक पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मालवीय नगर पोलीस ठाण्याजवळील एका हनुमान मंदिरालाही पाडण्याची नोटीस देण्यात आली होती. ही माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि तरुण मोठ्या संख्येने मंदिराबाहेर जमा झाले. त्यांनी रामधून आणि घोषणाबाजी करत आंदोलन केले.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

सुमारे चार तास आंदोलन केल्यानंतर प्रशासनाने स्थानिकांना ४८ तासांच्या आत मंदिराचा आकार कमी करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. स्थानिकांनी संताप व्यक्त करत सांगितले की, आज सत्तेत असलेले नगरसेवक शांत झोपले आहेत. जनतेची त्यांना पर्वा उरलेली नाही. आम्ही नगरसेवक आणि भानुबेन बाबरिया यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रतिसाद मिळाला नाही.

देश विदेश

# आयसीसचा म्होरक्या अबु बिलालचा अमेरिकेच्या लष्करी कारवाईत खात्मा

■ वॉशिंग्टन

**अमेरिका** आणि नायजेरियाच्या फौजांनी नियोजनबद्ध पद्धतीने राबवलेल्या संयुक्त लष्करी मोहीमेत आयसीस या मुस्लीम दहशतवादी संघटनेचा म्होरक्या अबु बिलाल याचा खात्मा केला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर ही माहिती दिली. माझ्या निर्देशावरून अमेरिकेचे धाडसी सैनिक आणि नायजेरियाच्या सशस्त्र सैनिकांनी अत्यंत नियोजनपूर्वक राबलेल्या लष्करी कारवाईत जगातील सर्वात क्रुर दहशतवादी अबु बिलाल याचा खात्मा केला आहे, असे ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले. अबु बिलाल जागतिक स्तरावर आयसीसचा दुसऱ्या क्रमांकाचा नेता होता. त्याला वाटले असेल की तो आफ्रिकेमध्ये लपून बसला तर आम्ही त्याला शोधू शकणार नाही. पण त्याला कल्पना नव्हती की, आमचे गुप्तहेर जगभरात पसरले आहेत. ते आम्हाला वेळोवेळी अचूक माहिती पुरवत असतात.

# हे दशक जागतिक आपत्तींचे आहे
## नेदरलँड्समध्ये मोदींचा भारतीयांशी संवाद

■ हेग

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी आज नेदरलँड्समध्ये दाखल झाले.येथे त्यांनी भारतीय समुदायाशी संवाद साधला. हे दशक जागतिक आपत्तींचे दशक आहे.परिस्थिती सुधारली नाही, तर याचे परिणाम पुढील काही दशके जगाला भोगावे लागतील,असा सावधगिरीचा इशारा मोदींनी दिला.

याप्रसंगी मोदींनी गेल्या दहा-बारा वर्षांत भारताने विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या चमकदार कामगिरीचा उल्लेख मोदींनी आवर्जून केला. आजचा भारत मोठे स्वप्ने पहात आहे. भारताने चंद्रावर अशा ठिकाणी पोहोचून नवा इतिहास घडवला की ज्या ठिकाणी अन्य कोणताही देश अद्याप पोहोचलेला नाही, असे मोदी म्हणाले.

नेदरलँड्स-भारत संबंधांबद्दल बोलताना मोदी म्हणाले की, माझी जेव्हा जेव्हा नेदरलँड्सच्या राज्यकर्त्यांशी चर्चा झाली तेव्हा त्या प्रत्येक चर्चेत त्यांनी भारतीय संस्कृतीची प्रशंसा केली.

काळाबरोबर बऱ्याच गोष्टी बदलल्या. परंतु भारतीय संस्कृती आजही लोकांच्या मनात स्थान मिळवून आहे. काळ बदलला पण संस्कृती आणि आपुलकी बदलली नाही, असे मोदी म्हणाले.

# सहारनपुरात आसाराम बापूच्या आश्रम संचालकाची हत्या

■ सहारनपूर

**उत्तर** प्रदेशातील सहारनपूरच्या अंबाला रोडवरील आसाराम बापूच्या आश्रमाच्या संचालक भरत गुप्ता (३५) यांच्या डोक्यात एका नोकराने लोखंडी सळीने वार केला. त्याला गंभीर अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली. कुतुबशेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंबाला रोडवर आसाराम बापूंचा 'भक्त वात्सल्य' नावाचा एक आश्रम आहे. ओडिशाचा रहिवासी असलेला भरत गुप्ता गेल्या अनेक वर्षांपासून या आश्रमाचा कारभार पाहत होता. सेवादार गौरव हा भरत गुप्ताकडे पाच लाख रुपये मागण्यासाठी आश्रमात पोहोचला. त्यावेळी आश्रमात गुप्ता औषध वितरण कक्षात बसले होते. त्याने पैशांची मागणी करताच दोघांमध्ये वाद झाला.

# नोएडा आंदोलकांचा छळ? त्यांना न्यायालयात हजर करा

सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

■ नोएडा

**नोएडा** आंदोलनातील कामगारांच्या प्रकरणात अटक केलेल्या दोन जणांना तुरुंगात छळ करण्यात आल्याचा आरोप एका कुटुंबियाने केल्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी उत्तर प्रदेश सरकारला त्यांना न्यायालयात हजर करण्याचे आदेश दिले.

न्या.बी.व्ही. नागरत्ना आणि न्या.उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने आदित्य आनंद आणि रुपेश रॉय यांना १८ मे रोजी दुपारी २ वाजता न्यायालयात हजर करण्याचे आदेश दिले आहेत. आदित्य आनंदचा भाऊ, केशव आनंद याने सर्वोच्च न्यायालयात याचिका केली आहे.

या याचिकेत असा आरोप करण्यात आला आहे की, गेल्या महिन्यात नोएडा येथील औद्योगिक कामगारांच्या आंदोलनांना चिथावणी दिल्याचा आरोप असलेल्या प्रकरणात अटक केल्यानंतर उत्तर प्रदेश पोलिसांनी आदित्य आनंदचा पोलीस कोठडीत छळ केला.

# बाजोरमध्ये लष्करी छावणीवर हल्ला! ९ दहशतवादी ठार

■ पेशावर



**खैबर** पख्तुनख्वाच्या बाजोर जिल्ह्यातील लष्करी छावणीवरील हल्ला परतवून लावताना पाकिस्तानी लष्कराने ९ दहशतवाद्यांना ठार केले. त्यासोबत एका मेजरसह ४ जवानांचा मृत्यू झाला. तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानने एका निवेदनात या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली.

दहशतवाद्यांनी गुरुवारी रात्री स्फोटकांनी छावणीवर हल्ला केला आणि गोळीबार करत एका प्रवेशद्वारातून छावणी उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु पाकिस्तानी लष्करांनी वेळीच आणि प्रभावीपणे प्रत्युत्तर दिले. दहशतवादी छावणीत प्रवेश करू शकले नाहीत. या चकमकीत ९ दहशतवादी ठार झाले असून चार जवान शहीद झाले आहेत. जखमी जवानांना वैद्यकीय उपचारासाठी पेशावरला नेण्यात आले आहे.पाकिस्तान लष्कर आणि बलुचिस्तान फ्रंटियर कॉर्प्सने मार्खमच्या नोशाम भागात संयुक्त कारवाई करत बंडखोरांकडून शस्त्रे, दारूगोळा

**४ जवानांचा मृत्यू**

आणि स्फोटके जप्त केल्याचा दावा केला आहे. बलुचिस्तानमधील बंडखोर वारंवार सुरक्षा दलांना आणि सरकारी आस्थापनांना लक्ष्य करतात. पाकिस्तानी सरकार या हल्ल्यांसाठी बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) आणि तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान (टीटीपी) यांना जबाबदार धरते.

# मनोरीत खारे पाणी गोडे करण्याच्या प्रकल्पासाठी केंद्र सरकारची मंजुरी

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेकडून मनोरी येथे समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याचा महत्त्वाकांक्षी निःक्षारीकरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील २०० दशलक्ष लीटर पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी केंद्र सरकारकडून सीआरझेडची मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे या प्रकल्पाला आता गती मिळणार आहे.

मनोरी येथील या प्रकल्पामुळे मालाड, गोरेगाव, कांदिवली, बोरिवली आणि दहिसर परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पुढील आठ ते दहा दिवसांत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि मेरिटाईम बोर्डाची मंजुरी मिळण्याची शक्यता असून पावसाळ्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. मनोरी निःक्षारीकरण प्रकल्पांतर्गत समुद्रात सुमारे दोन किलोमीटर लांबीचे दोन बोगदे बांधले जाणार आहेत. यातील एक बोगदा समुद्राचे पाणी प्रकल्पापर्यंत आणण्यासाठी, तर दुसरा प्रक्रिया केलेले पाणी सोडण्यासाठी वापरण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात दररोज २०० दशलक्ष लीटर पाण्यावर प्रक्रिया केली जाणार आहे.

# उरणमध्ये नैसर्गिक ओढे बुजवले पावसाळ्यात पूरस्थितीची भीती

बांधकामांवर कारवाईची मागणी

■ उरण

**उरण** तालुक्यातील चिले-दिघोडे आणि गव्हाण फाटा-चिरनेर मार्गालगत असलेल्या नैसर्गिक ओढ्यांचा प्रवाह बदलल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. खासगी यार्ड मालकांनी संगनमताने दगड-मातीचा बेकायदेशीर भराव टाकून ओढ्यांचे मार्ग बंद केल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांकडून केली जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, काही व्यावसायिक आणि विकासकांनी स्थानिक प्रशासनाच्या संगनमताने नैसर्गिक मोऱ्यांलगत भिंती उभारल्या आहेत. या मानवनिर्मित अडथळ्यांमुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊन रस्ते पाण्याखाली जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. चिले, वेश्वी, दिघोडे, विंधणे, चिरनेर, कोप्रोली, पिरकोण, सारडे, वशेणी आणि बांधपाडा ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणात भराव टाकून शेती आणि खाडीकिनाऱ्यांचे नुकसान केल्याचेही सांगितले जात आहे. अनेक ठिकाणी नैसर्गिक पाण्याचे स्रोतच बुजवण्यात आल्याने पावसाळी पाण्यासाठी मार्ग उरलेला नाही. उरण तालुक्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सामाजिक कार्यकर्ते बी. एम. ठाकूर यांनी या प्रकारावर संताप व्यक्त करत म्हणाले की, स्वतःच्या फायद्यासाठी नैसर्गिक ओढ्यांमध्ये हस्तक्षेप करून नियमांची पायमल्ली केली जात आहे.

# मालदीवमधील खोल पाण्यात पाच स्कूबा डायव्हर बुडाले

■ माले

**पाच** इटालियन पाणबुडे (डायव्हर) मालदीवमध्ये पाण्याखालील गुहा शोधताना मृत्युमुखी पडले. हा मालदिवच्या इतिहासातील सर्वात भीषण डायव्हिंग अपघात असल्याचे स्थानिक अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. आतापर्यंत फक्त एक मृतदेह सापडला असून, खराब हवामानामुळे शोधकार्यात अडथळे येत आहेत.

पाचही डायव्हर्स व्हावू ॲटोल येथील पाण्याखालील गुहा शोधण्यासाठी ५० मीटर खोलीवर गेले होते, मात्र ते पुन्हा वर आलेच नाहीत. यातील बेनेडेट्टी या डायव्हरचा मृतदेह गुहेच्या प्रवेशद्वाराजवळ सापडला आहे. उर्वरित डायव्हर्स आत गुहेत अडकले असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मालदीव सरकारने सांगितले की, हे सर्व डायव्हर्स ड्यूक ऑफ यॉर्क नावाच्या यॉटचा वापर करून मोहिमेवर गेले होते. पाचपैकी किमान चार जण जेनोआ विद्यापीठाशी संबंधित होते. बेनेडेट्टी यॉटवरील ऑपरेशन्स मॅनेजर होता.

# पिंपरीतील फर्निचर मॉलवर बिश्नोई टोळीकडून गोळीबार

आरोपी काही क्षणांत पसार

■ पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवडमधील** रावेत येथील 'एजे फर्निचर मॉल' वर रात्री साडेनऊ वाजता दोन अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. या प्रकारानंतर पोलीस यंत्रणा तातडीने सक्रिय झाले. लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधित असल्याचा दावा करणाऱ्या शुभम लोणकरने सोशल मीडियावर पोस्ट करत या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारल्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी मॉलसमोर येत थेट गोळीबार सुरू केला. त्यांच्या हातात दोन पिस्तुले होती आणि त्यांनी मॉलच्या दिशेने पाच ते सहा राऊंड फायर केले. गोळ्या मॉलच्या नेमप्लेट आणि काचेवर लागल्याने नुकसान झाले. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. गोळीबार केल्यानंतर आरोपी काही क्षणांत घटनास्थळावरून पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी, गुन्हे शाखेचे पथक आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेत तपास सुरू केला आहे.

या प्रकरणाला आणखी गंभीर वळण तेव्हा मिळाले, जेव्हा लॉरेन्स बिश्नोई गँगशी संबंधित असल्याचा दावा करणाऱ्या शुभम लोणकरने सोशल मीडियावर पोस्ट करत या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली. या पोस्टमध्ये एजे फर्निचर मॉलचे मालक अशोक नैन यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तसेच हा फक्त ट्रेलर आहे, पुढची गोळी थेट डोक्यात असेल, असा इशाराही देण्यात आला आहे. पोलिसांकडून या सोशल मीडिया पोस्टची सत्यता आणि त्यामागील व्यक्तींची पडताळणी केली जात आहे. या घटनेनंतर आणखी एक ऑडिओ क्लिप समोर आली आहे. या ऑडिओमध्ये स्वतःला लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ आरजू बिश्नोई असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीने गोळीबाराची जबाबदारी स्वीकारल्याचे सांगितले जात आहे.

# जळगावात शिक्षकाकडून चौथीतील विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यातील धरणगाव तालुक्यात एका जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाने इयत्ता चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा लैंगिक छळ केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी आरोपी शिक्षक नंदलाल नारायण मराठे याच्याविरुद्ध धरणगाव पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

पीडित मुलगी ही धरणगाव तालुक्यातील एका गावात कुटुंबासह राहते. ती जिल्हा परिषद शाळेत इयत्ता चौथीत शिक्षण घेत आहे. आरोपी शिक्षक नंदलाल मराठे हा तिला शाळा सुरू होण्यापूर्वी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास झाडू मारण्याच्या बहाण्याने शाळेत बोलावून घेत असे. शाळेत कोणी नसल्याचा फायदा घेत तो तिच्यासोबत घृणास्पद कृत्य करत असल्याचा आरोप आहे. तसेच मोबाईलवर अश्लील व्हिडिओ दाखवत तिचा लैंगिक छळ केला.

३० एप्रिल २०२६ रोजी शाळेच्या शेवटच्या दिवशी आरोपी शिक्षकाने विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून धरणगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करत त्याला अटक केली.

शाळेला उन्हाळी सुट्टी लागल्यानंतर पीडित मुलगी मावशीकडे गेली होती. तेथे तिची प्रकृती बिघडली आणि तिने जेवण करणेही बंद केले. नातेवाईकांनी विश्वासात घेऊन विचारपूस केली असता तिने रडत रडत आपल्यासोबत घडलेला प्रकार सांगितला. आरोपी शिक्षक गेल्या दोन वर्षांपासून तिचे सातत्याने लैंगिक शोषण करत असल्याचा आरोप आहे.

तसेच या प्रकाराला विरोध केल्यास मारहाण केली जात होती. कोणाला काही सांगितल्यास आई-वडिलांचा जीव जाईल, अशी धमकी देत आरोपी तिला गप्प बसवत असल्याचे पीडितेने सांगितले आहे.

# पुण्यामध्ये चुलत आजोबाकडून ९ वर्षीय नातीवर अत्याचार

■ पुणे

**पुण्यातील** येवलेवाडी परिसरात एका ९ वर्षीय नातीवर तिच्याच चुलत आजोबाकडून लैंगिक अत्याचार करण्यात आला. या प्रकरणी लोहगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ७० वर्षीय आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

**७० वर्षीय आरोपी पोलिसांच्या ताब्यात**

पीडित मुलीचे कुटुंब मूळचे नेपाळमधील असून कामानिमित्त पुण्यात वास्तव्यास आहे. घरात कुणी नसल्याची संधी साधत आरोपीने अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याचा आरोप आहे. कुटुंबियांनी दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीविरुद्ध लैंगिक अत्याचार आणि विनयभंगाचे गुन्हे दाखल केले.

गेल्या आठवड्यातही पुण्यातील पर्वती पायथा परिसरात अशाच प्रकारची घटना उघडकीस आली होती. त्या प्रकरणातही एका ९ वर्षीय नातीवर तिच्या आजोबाकडून अत्याचाराचा प्रयत्न करण्यात आला होता.

# युवकांबद्दल मला आदर वाटतो सरन्यायाधीशांचे स्पष्टीकरण

■ नवी दिल्ली

**देशातील** बेरोजगार युवकांना झुरळाची उपमा देणाऱ्या सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या वक्तव्यावरून देशभरात नाराजीचे सूर उमटताच आज सरन्यायाधीशांनी स्पष्टीकरण दिले. माझा रोख बनावट पदव्या घेऊन वकिली पेशामध्ये घुसखोरी करणाऱ्या विशिष्ट लोकांकडे होता. दुर्दैवाने माझे वक्तव्य चुकीच्या पद्धतीने सादर करण्यात आले, असे सरन्यायाधीश म्हणाले.

शुक्रवारी एका वकिलाने केलेल्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्य कांत कमालीचे संतप्त झाले होते. समाजात आधीच असंख्य परजिवी आहेत. बेरोजगार तरुण तर झुरळांसारखे व्यवस्थेवर तुटून पडत आहेत, असे रागाच्या भरात बोलून सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्याला तुम्हीदेखील त्यांच्या कळपात सामील होऊ इच्छिता का, असा सवाल विचारला होता. त्यांच्या या वक्तव्यातील युवकांना झुरळाची उपमा देणाऱ्या विधानामुळे देशभरातील युवा वर्गात नाराजी पसरली होती.

# नवी मुंबईतील एपीएमसी मसाला मार्केटमध्ये आग

■ मुंबई

**नवी** मुंबईतील वाशी येथील एपीएमसी मसाला मार्केटमध्ये आज दुपारी आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मसाला मार्केटमधील ई-१२ क्रमांकाच्या दुकानातून अचानक धूर आणि आगीच्या ज्वाळा उसळू लागल्यानंतर व्यापाऱ्यांमध्ये घबराट निर्माण झाली. या आगीत मोठ्या प्रमाणात ड्रायफ्रूट आणि इतर माल जळून खाक झाला. दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास दुकान क्रमांक ई-१२ मध्ये आग लागली. आग लागल्याची माहिती मिळताच वाशी अग्निशमन दलाच्या चार गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या.

# गरज कठोर परीक्षाप्रणालीची

पान ३ वरून

आले होते. राजस्थान पोलिसांकडे तक्रार नोंदवल्यानंतर 'एनटीए'ने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात यंदा प्रश्नपत्रिका फुटू नयेत म्हणून करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली होती. 'जीपीएस' ट्रॅकिंग, 'सीसीटीव्ही' निरीक्षण व्यवस्था, '५जी जॅमर्स' यांसारख्या तांत्रिक साधनांचा वापर करण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. मात्र एवढ्या कडक सुरक्षेनंतरही प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोप समोर आला. २०२४ मध्ये बिहारमध्ये प्रश्नपत्रिकेची उघड विक्री झाल्याचे समोर आले होते आणि आता राजस्थानमध्ये तशाच प्रकारच्या घटना आढळत आहेत.

यामुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्वतंत्र संस्था असूनही 'एनटीए'चे सर्व प्रयत्न पुन्हा अपयशी का ठरले? प्रश्नपत्रिका फोडणाऱ्या संघटित जाळ्यांपुढे संस्थेची संपूर्ण सुरक्षा व्यवस्था निष्प्रभ ठरली का? राष्ट्रीय प्रवेश परीक्षांसाठी सध्या वापरली जाणारी बहुपर्यायी वस्तुनिष्ठ परीक्षा पद्धतच अधिक धोकादायक ठरत आहे का? या परीक्षांचे स्वरूप, प्रश्नपत्रिका वितरण प्रणाली आणि मूल्यमापन प्रक्रिया यांचा नव्याने गंभीर विचार करण्याची गरज आता निर्माण झाली आहे.

जगातील अनेक मोठ्या देशांमध्ये उच्च शिक्षण आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. किरकोळ अडचणी सर्वत्र दिसतात; परंतु भारतासारख्या प्रश्नपत्रिका फुटीच्या धाडसी घटना अमेरिका, युरोप किंवा चीनमध्ये क्वचितच ऐकू येतात. चीनमध्ये 'गाओकाओ' नावाची राष्ट्रीय प्रवेश परीक्षा घेतली जाते. या परीक्षेत दरवर्षी तब्बल १.३ ते १.५ कोटी विद्यार्थी सहभागी होतात.

२०२५ मध्ये १.३४ कोटी विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. त्या काळात संपूर्ण चीनमध्ये रेल्वे, बस आणि विमान प्रवासांवर प्रचंड ताण निर्माण होतो. इतक्या मोठ्या प्रमाणावर परीक्षा होत असूनही तेथे प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटना जवळजवळ घडत नाहीत. काही किरकोळ अनियमितता दिसतात; मात्र कठोर शिक्षा आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरामुळे मोठे गैरप्रकार रोखले जातात. परीक्षेमध्ये गैरप्रकार करताना कोणी आढळल्यास किमान सात वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे.

'नीट'ची रद्द झालेली परीक्षा पुन्हा घेतली जाईल. कारण या प्रवेश परीक्षा म्हणजे देशातील युवकांना भविष्य घडविण्याची मोठी संधी असते. या परीक्षांमध्ये यश मिळविणे अत्यंत कठीण असते. लाखो विद्यार्थ्यांपैकी केवळ पाच ते दहा टक्के विद्यार्थीच यशाच्या जवळ पोहोचू शकतात.

तरीही पैशांच्या जोरावर आणि फसवणुकीच्या माध्यमातून प्रवेश मिळवून देण्याचा काळाबाजार अनेक दशकांपासून सुरू आहे. दलाल, मध्यस्थ आणि फसवणूक करणारे जाळे दरवर्षी कोट्यवधी रुपये कमावत असताना निष्पाप विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबांची आर्थिक व मानसिक लूट होत राहते. म्हणूनच आता केवळ तात्पुरत्या उपाययोजना पुरेशा राहिलेल्या नाहीत. पेपरफुटीच्या घटना पुन्हा घडणार नाहीत, अशी अधिक विश्वासार्ह, पारदर्शक आणि कठोर परीक्षा प्रणाली उभारणे ही देशासमोरील अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे.

GWELD SEAL OF TRUST
जीईई लिमिटेड
सीआयएन: L99999MH1960PLC011879
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. ई-१, रस्ता क्र. ७, वागळे औद्योगिक वसाहत, ठाणे-४००६०४
वेबसाईट: http://www.geelimited.com ईमेल: Shares@geelimited.com
दूरध्वनी: (०२२) २५८२१२७७, फॅक्स: (०२२) २५८२८९३८

दि. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता स्वतंत्र लेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष

सेबी (सूचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ ("सेबी सूचिबद्धता विनियमन") च्या विनियमन ३३ नुसार, जीईई लिमिटेड ("कंपनी") च्या संचालक मंडळाने त्यांच्या शुक्रवार, दि. १५ मे, २०२६ रोजी घेण्यात आलेल्या सभेमध्ये दि. ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता स्वतंत्र अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष ("निष्कर्ष") मंजूर केले.
मे. एसएपीडी ॲण्ड असोसिएट्स, कंपनीकरिता वैधानिक लेखापरिक्षक यांच्या मर्यादित पुनरावलोकन अहवाल (स्वतंत्र) सह निष्कर्ष कंपनीची वेबसाईट https://www.geelimited.com आणि बीएसई लिमिटेडची वेबसाईट म्हणजेच www.bseindia.com येथे उपलब्ध आहेत.
सेबी सूचिबद्धता विनियमनाच्या विनियमन ४७ नुसार, आम्ही याद्वारे सूचित करतो की, ते निष्कर्ष खालील क्विक रिस्पॉन्स (क्यूआर) कोड स्कॅन करून देखील प्राप्त करता येतील:

जीईई लिमिटेड च्या
संचालक मंडळाकरिता आणि त्यांच्या वतीने
सही/-
श्री. उमेश अगरवाल
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ०१२०९९६२

ठिकाण: कल्याण
दिनांक: १५.०५.२०२६

रामेश्वर मीडिया

नवाकाळ

Email- contact@navakal.in www.navakal.in /navakalofficial

# मच्छी विक्रीवरून बदलापुरात वाद पेटला! शिंदे गट-भाजपा आमनेसामने

■ बदलापूर

**बदलापुरातील** चौक, नाके आणि रस्त्यांवर मच्छी विक्रीमुळे निर्माण होणारी दुर्गंधी व अस्वच्छतेच्या तक्रारींनंतर पालिकेने मच्छी विक्रेत्यांवर कारवाईचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे शहरात राजकीय वातावरण तापले असून शिंदे गट आणि भाजपा आमनेसामने आले आहेत.

पालिकेच्या आदेशानंतर शिंदे गट आक्रमक झाला आहे. शिंदे गटाचे शहराध्यक्ष वामन म्हात्रे म्हणाले की, मच्छी विक्रेत्यांचा रोजगार बंद होऊ देणार नाही. शहरात शांतता राखायची असेल तर मच्छिमारांना समजून घ्या, अन्यथा कारवाई झाल्यास आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू.

**आदेश पाळा, अन्यथा विक्रीस परवानगी नाही**

तर भाजपाच्या नगराध्यक्ष रुचिता घोरपडे यांनी पालिकेच्या निर्णयावर ठाम भूमिका घेतली आहे. त्या म्हणाल्या की, शहराच्या स्वच्छतेसाठी सभागृहात हा निर्णय घेण्यात आला आहे. आदेश पाळा, अन्यथा शहरात विक्रीस परवानगी दिली जाणार नाही.

# एनसीबीने पहिल्यांदाच जप्त केले १८२ कोटींचे 'जिहादी ड्रग'

■ नवी दिल्ली

**दिल्ली** पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने (एनसीबी) पहिल्यांदाच कथित जिहादी ड्रगचा मोठा साठा जप्त केला. आंतरराष्ट्रीय बाजारात या साठ्याची किंमत सुमारे १८२ कोटी रुपये आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एक्स पोस्टवर ही माहिती दिली.

अमली पदार्थाचा हा साठा मध्य पूर्वेतील देशांमध्ये पाठवण्यात येणार होता. मात्र त्याआधीच सुगावा लागल्याने एनसीबीच्या पथकाने धाड टाकून हा साठा जप्त केला.यावरून अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी सरकार कसे सज्ज आहे, याची झलक दाखवणारे हे उत्तम उदाहरण आहे. आम्ही अमली पदार्थांविरूध्द व्यापक मोहीम सुरू केली आहे. एक ग्रॅमही अंमली पदार्थांची आम्ही तस्करी होऊ देणार नाही, असे शहा पुढे म्हणाले.

# आसाम मुख्यमंत्र्यांचे पुत्र नंदिल शर्माची आयर्नमॅन व्हिएतनाम स्पर्धा पूर्ण



■ गुवाहाटी

**आसामचे** मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांचे पुत्र नंदिल यांनी सुमारे १६ तासांत 'आयर्नमॅन व्हिएतनाम' ट्रायथलॉन स्पर्धा पूर्ण केली. २४ वर्षीय नंदिल हे बंगळुरुमधील नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटीचे अंतिम वर्षाचे विद्यार्थी आहेत. ३.८ किमी खुल्या पाण्यातील पोहणे, १८० किमी सायकलिंग आणि ४२.२ किमी पूर्ण मॅरेथॉन धावणे हा टप्पा पूर्ण केला. याआधी त्यांनी बहरीनमध्ये आयोजित 'आयर्नमॅन ७०.३' स्पर्धाही पूर्ण केली होती.

विद्यापीठातून पदवी मिळण्यापूर्वी आयर्नमॅन स्पर्धा पूर्ण करण्याचे त्यांचे स्वप्न होते आणि केवळ सात ते आठ महिन्यांच्या तयारीनंतर त्यांनी हे लक्ष्य गाठले. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा शर्मा यांनी 'एक्स'वर आपल्या मुलाच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला. त्यांनी म्हटले आहे की, एक पिता म्हणून त्याची शिस्त, जिद्द आणि चिकाटी पाहून मला अत्यंत अभिमान वाटतो. त्याच्या पुढील प्रवासासाठी आणि आयुष्यातील अनेक यशस्वी टप्प्यांसाठी मी शुभेच्छा देतो.

व्हिएतनाममधील दा नांग या किनारी शहरात आयोजित करण्यात आलेली 'आयर्नमॅन व्हिएतनाम' स्पर्धा आशियातील प्रतिष्ठित दीर्घ पल्ल्याच्या सहनशक्ती स्पर्धांपैकी एक मानली जाते. ही स्पर्धा 'आयर्नमॅन वर्ल्ड चॅम्पियनशिप'साठी पात्रता मिळवण्याची महत्त्वाची संधीही असते.

ही स्पर्धा केवळ शारीरिक ताकद नव्हे, तर मानसिक सहनशक्तीचीही कठोर परीक्षा घेते. विशेषतः दिवसभर पोहणे आणि सायकलिंग केल्यानंतर मॅरेथॉन धावणे पूर्ण करणे हे मोठे आव्हान मानले जाते.

# येस बँकेचे राणा कपूर यांच्याविरोधात नवा गुन्हा

■ मुंबई

**येस** बँकेचे माजी अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राणा कपूर यांच्यासह इतरांविरोधात तारण ठेवलेल्या मालमत्तांची नियमांचे पालन न करता विक्री केल्याप्रकरणी फसवणूक आणि बनावट कागदपत्रांचा नवा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सॅफायर लँड डेव्हलपमेंट लिमिटेडचे संचालक लखामिंदर सिंग यांनी त्यांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. त्यांनी आरोप केला की, कर्जफेडीत चूक झाल्यानंतर त्यांच्या सुमारे १,००० कोटी रुपयांच्या तारण मालमत्तांपैकी काही मालमत्ता बाजारभावापेक्षा कमी दरात विकण्यात आल्या. या कंपनीने २०१६ ते २०१८ दरम्यान येस बँकेकडून १५० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्जवसुलीसाठी तारण मालमत्ता कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न पाळता पुनर्रचना कंपनीकडे बेकायदेशीररित्या हस्तांतरित करण्यात आल्या. बँकेतील अधिकारी आणि इतर आरोपींच्या संगनमताने हे हस्तांतरण करण्यात आल्याचा आरोप



करण्यात आला आहे. त्यानंतर काही मालमत्ता कमी किमतीत विकण्यात आल्या, ज्यामुळे कंपनीला जवळपास १,००० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या बँकिंग विभागाने हा गुन्हा नोंदवून वरळी पोलिसांकडे तपास सोपवला आहे. पोलिसांनी राणा कपूर, सुरक्षाआर्कचे अधिकारी सुधीर वालिया आणि इतरांविरोधात गुन्हेगारी कट, फसवणूक, बनावट कागदपत्रे तयार करणे, विश्वासघात यांसह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा आता २८ जूनला



■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता (महाटीईटी) २०२६ परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. यापूर्वी २१ जून २०२६ रोजी होणारी परीक्षा आता २८ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती परीक्षा परिषद आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली. २१ जून रोजी राष्ट्रीय स्तरावरील नीट परीक्षा देशभरात होणार असल्याने दोन्ही परीक्षांची केंद्रे एकच येत होती. त्यामुळे परीक्षेचे नियोजन सुरळीत पार पडावे आणि परीक्षार्थ्यांना अडचण येऊ नये, या उद्देशाने हा बदल करण्यात आला आहे. नव्या वेळापत्रकानुसार, महाटीईटी २०२६ परीक्षेचे प्रवेशपत्र १६ जून ते २८ जूनदरम्यान ऑनलाईन उपलब्ध होणार आहे.

पेपर १ हा २८ जून रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.०० या वेळेत होईल, तर पेपर २ दुपारी २.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत घेतला जाणार आहे. दरम्यान, काही प्रशासकीय कारणांमुळे वेळापत्रकात पुन्हा बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परीक्षार्थ्यांनी अद्ययावत माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ https://mahatet.in वर लक्ष ठेवावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# कल्याणमध्ये कचरागाडीखाली चिरडून चिमुरड्याचा मृत्यू

■ कल्याण

**कल्याण- डोंबिवली** महानगरपालिकेच्या कंत्राटी कचरा गाडीखाली चिरडून दोन वर्षांच्या चिमुरड्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरावर शोककळा पसरली. कल्याण ग्रामीणमधील वसार गावात ही घडना घडली आहे. शिवम राठोड असे मृत मुलाचे नाव आहे. शिवम आपल्या घरासमोर खेळत होता. तेवढ्यात तिथे कचरा गोळा करण्यासाठी आलेल्या गाडीने शिवमला चिरडले. या घटनेत शिवमचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच हिललाईन पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. शिवमचा मृतदेह ताब्यात घेऊन पोलिसांनी शवविच्छेदनासाठी कल्याण येथील रुक्मिणीबाई रुग्णालयात पाठवला.

# उत्तर प्रदेशात आठवड्यातून दोन दिवस वर्क फ्रॉम होम

**लखनौ** - दिल्लीपाठोपाठ उत्तर प्रदेश सरकारनेही आठवड्यातील दोन दिवस वर्क फ्रॉम होम जाहीर केले आहे. उत्तर प्रदेशात वाढता खर्च आणि गॅसची कमतरता यामुळे अनेक उद्योगांवर संकट आले आहे. याबाबत श्रम विभागाच्या उच्चस्तरीय बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यात असे ठरले की ऊर्जा वापर कमी करण्यासाठी आणि उद्योगांना दिलासा देण्यासाठी आठवड्यातून दोन दिवस वर्क फ्रॉम होम व्यवस्था लागू केली जाईल. तसेच कार्यालये आणि कारखाने वेगवेगळ्या पाळीमध्ये चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गॅसपुरवठा प्रभावित झाल्यामुळे उत्पादन खर्च वाढला आहे. त्यामुळे अनेक उद्योगांमध्ये नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत. सरकार लवकरच सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी करणार आहे.

# बीकेसीतील एमटीएनएलच्या जागेचे ३५० कोटी खर्चून नाबार्डला हस्तांतर

■ मुंबई

**मुंबईतील** महत्त्वाच्या व्यावसायिक केंद्रांपैकी एक असलेल्या वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) येथील महानगर टेलिफोन निगम लिमिटेड (एमटीएनएल)च्या इमारतीचे भाडेपट्ट्याचे हक्क आता नॅशनल बँक फॉर ॲग्रिकल्चर अँड रुरल डेव्हलपमेंट कडे (नाबार्ड)हस्तांतरित झाले आहेत. या व्यवहारासाठी नाबार्डने ३५०.७२ कोटी रुपये मोजले असून व्यवहाराची नोंदणी नुकतीच पूर्ण झाली आहे.

रिअल इस्टेट डेटा ॲनालिटिक्स फर्म 'सीआरई मॅट्रिक्स'कडून मिळालेल्या कागदपत्रांनुसार, या व्यवहारासाठी नाबार्डने २१.०४ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क भरले आहे. हा व्यवहार बीकेसीमधील जीएन ब्लॉक येथील प्लॉट क्रमांक आर-४ संदर्भात झाला आहे. सुमारे २,६८० चौरस मीटर जागेवर उभारलेल्या दोन इमारतींच्या या व्यावसायिक संकुलाचे एकूण बांधकाम क्षेत्र ४,०२१.४३ चौरस मीटर इतके आहे. या मालमत्तेच्या भाडेपट्ट्याशी संबंधित कायदेशीर दस्तावेजाची नोंदणी ८ मे रोजी करण्यात आली. बीकेसी हे मुंबईतील प्रमुख आर्थिक आणि व्यावसायिक केंद्र मानले जाते. येथे अनेक बँका, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि सरकारी कार्यालये कार्यरत आहेत. नाबार्ड या जागेचा वापर कार्यालयीन कामकाजासाठी करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ३० मार्चपासून या मालमत्तेशी संबंधित सर्व आर्थिक जबाबदाऱ्या म्हणजे जमिनीचे भाडे, हस्तांतरण शुल्क, महापालिका कर आणि देखभाल खर्च, आता नाबार्डकडे असतील. एमटीएनएलने या मालमत्तेवरील आपले सर्व हक्क पूर्णपणे सोडले असून व्यवहाराची संपूर्ण रक्कम प्राप्त झाल्याचे सांगितले जात आहे.

# रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन प्रकल्प प्रस्ताव सादर करा! आरोग्यमंत्र्यांच्या सूचना

■ मुंबई

**ग्रामीण** भागातील स्ट्रोक रुग्णांना 'गोल्डन अवर'मध्ये तातडीने आणि अत्याधुनिक उपचार देण्यासाठी रिमोट



'रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन' हा दूरस्थ पद्धतीने रोबोटिक उपचार सुविधा देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत स्ट्रोक (पक्षाघात) रुग्णसंख्येत वाढ होत आहे. अशा रुग्णाना 'गोल्डन अवर'मध्ये उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. अशावेळी तज्ज्ञ डॉक्टर व आधुनिक सुविधा वेळेत न मिळाल्यास रुग्णाला कायमस्वरूपी पक्षाघाताचा धोका वाढतो. हे लक्षात घेऊन तालुका व जिल्हास्तरीय शासकीय रुग्णालयांमध्ये स्थानिक पातळीवरच अत्याधुनिक रिमोट रोबोटिक न्यूरोइंटरव्हेन्शन उपचार उपलब्ध करून देण्याचा आरोग्यमंत्र्यांचा मानस आहे.

# ओडिशातील भाविकाकडून साईबाबांना १० लाखांचा ब्रोच

■ शिर्डी

**भाविकांचे** श्रद्धास्थान असलेल्या शिर्डी साईबाबा मंदिरात ओडिशातील भुवनेश्वर येथील संजूक्ता स्वान यांनी सुमारे १० लाख रुपये किमतीचा सोन्याचा ब्रोच साईबाबांच्या चरणी अर्पण केला.

संजूक्ता स्वान आणि त्यांचा परिवार गेल्या १७ वर्षांपासून नियमितपणे शिर्डीत येत असून, वर्षातून किमान दोन वेळा साईबाबांचे दर्शन घेतात. 'साईबाबांनी आम्हाला सर्व काही दिले आहे. ही देणगी केवळ श्रद्धेपोटी आहे,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली. हा विशेष ब्रोच शुद्ध सोन्यात तयार केला आहे. त्यावर आकर्षक कुंदन काम करण्यात आले आहे. दर्शन घेतल्यानंतर त्यांनी हा सुवर्ण ब्रोच श्री साईबाबा संस्थान ट्रस्टकडे सुपूर्द केला. संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी भीमराव



दराडे यांनी हा ब्रोच स्वीकारला. यावेळी संस्थानच्या वतीने संजूक्ता स्वान आणि त्यांच्या परिवाराचा साईबाबांची मूर्ती व शाल देऊन सत्कार केला.

# कोकणवासियांसाठी विशेष १० उन्हाळी गाड्या चालवणार

■ मुंबई

**उन्हाळी** सुट्ट्यांमुळे कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली असून रेल्वे व इतर वाहतुकीवर मोठी गर्दी होत आहे. ही गैरसोय लक्षात घेऊन मध्य रेल्वेने कोकण मार्गावर १० अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या सेवांमध्ये ८ गाड्या सावंतवाडी रोडसाठी आणि २ गाड्या मडगावसाठी चालवण्यात येणार आहेत. पनवेल-सावंतवाडी रोड साप्ताहिक विशेष गाडी ही १६ मे ते ६ जून २०२६ दर शनिवारी सायंकाळी ६.१० वाजता पनवेलहून सुटून दुसऱ्या दिवशी पहाटे ४.३० वाजता सावंतवाडी रोड येथे पोहोचेल. परतीची गाडी सावंतवाडी रोडहून सकाळी ७.२० वाजता सुटून सायंकाळी ५.०० वाजता पनवेल येथे येईल.

# मानखुर्दमध्ये नवीन कारागृहासाठी १२०० झोपड्या हटवून जमीन मोकळी

■ मुंबई

**राज्यातील** कारागृहांवरील वाढता ताण आणि कैद्यांची वाढती संख्या लक्षात घेता १२०० झोपड्या हटवून जमीन मोकळी करण्यात आली आहे. घाटकोपर-मानखुर्द लिंक रोडलगतची ११ एकर शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त करून नवीन कारागृह उभारण्यासाठी मुंबई मध्यवर्ती कारागृह प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मुंबई उपनगर जिल्ह्याचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थितीत अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांच्याकडे जमिनीचा आगाऊ ताबा सुपूर्द करण्यात आला. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबवून प्रशासनाने अवघ्या एका दिवसात १२०० हून अधिक झोपड्या हटवत ११ एकर जागा मोकळी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मौजे मानखुर्द येथील गट क्रमांक



१/२ मधील ही जमीन कारागृहासाठी देण्याचे निर्देश देण्यात आले होते. या निर्णयामुळे राज्यातील विशेषतः मुंबईतील कारागृह प्रशासनावरील अतिरिक्त ताण कमी होण्यास मदत होणार असल्याचे सांगितले जात आहे. याबाबत चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, मुंबईच्या सुरक्षेच्या आणि प्रशासकीय व्यवस्थेच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासाठी विशेष बैठक घेऊन निर्णय घेतला होता.

# गडकरींकडे खंडणी मागणारा पुजारी पाशाला ५ वर्षांचा सश्रम कारावास

■ नागपूर

**केंद्रीय** मंत्री नितीन गडकरी यांना ठार मारण्याची धमकी देत १०० कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या प्रकरणात विशेष सत्र न्यायालयाने जयेश ऊर्फ जयेशकांत ऊर्फ शाहीर ऊर्फ शाकीर शशिकांत पुजारी आणि अफसर पाशा ऊर्फ बशीरोद्दीन ऊर्फ खुशीरोद्दीनला ५ वर्षांचा सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. प्रत्येकी ३५ हजार रुपयांचा दंडही सुनावण्यात आला आहे. न्या. अनिलकुमार शर्मा यांनी हा निकाल दिला. दोन्ही आरोपी सध्या कर्नाटकातील बेळगाव येथील हिडलंगा मध्यवर्ती कारागृहात इतर गुन्ह्यांमध्ये शिक्षा भोगत आहेत. कारागृहात असतानाच त्यांनी नितीन गडकरी यांच्याकडून खंडणी उकळण्याचा कट रचला होता. जयेश पुजारीने १४ जानेवारी आणि २१ मार्च २०२३ रोजी गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यालयात फोन करून पहिल्यांदा १०० कोटी आणि नंतर १० कोटी रुपयांची खंडणी मागितली होती.

# चेंबूरमध्ये जलबोगद्याच्या कामामुळे सोमवारी पाणीपुरवठा विस्कळीत

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेकडून अमर महाल (हेडगेवार उद्यान) ते तुर्भे निम्नस्तरीय जलाशय दरम्यानच्या जलबोगद्याचे महत्त्वाचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामामुळे सोमवार १८ मे रोजी सकाळी १० ते रात्री १० या १२ तासांच्या कालावधीत एम-पूर्व आणि एम-पश्चिम विभागातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत राहणार असून काही ठिकाणी कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

पालिका प्रशासनाने नागरिकांना आवश्यक तेवढे पाणी साठवून ठेवण्याचे आणि काटकसरीने वापरण्याचे आवाहन केले आहे. तसेच एम-पूर्व विभागातील प्रभाग क्रमांक १४६, १४७ आणि १४८ तसेच एम-पश्चिम विभागातील प्रभाग क्रमांक १५४ आणि १५५ मधील नागरिकांनी १८ मे ते २५ मे या कालावधीत



पाणी गाळून व उकळून वापरावे, अशी सूचना देण्यात आली आहे. एम-पूर्व विभागातील एचपीसीएल रिफायनरी वसाहत, वरुण बेवरेजेस, बीएआरसी, गव्हाणपाडा, इंडियन ऑईल कंपनी परिसर, बीपीसीएल वसाहत, टाटा वसाहत, नित्यानंद बाग, राणे चाळ, आरसीएफ वसाहत, भारतनगर, जे प्लॉट, हशू अडवाणीनगर, आणिक गाव, एमईसीबी वसाहत, सह्याद्रीनगर, आरएनए उद्यान, म्हाडा इमारती आदी भागांमध्ये पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. तर एम-पश्चिम विभागातील एमएस इमारती १ ते ३२, बीपीटी, इंडियन ऑईल, टाटा पॉवर, एजीस केमिकल, भारत पेट्रोलियम, आरसीएफ लिमिटेड, चेंबूर कॅम्प, सिंधी कॅम्प, विजय विहार, सुमननगर, भक्ती भवन, चिखलवाडी, समर्थनगर, बसंत पार्क, गांधी बाजार, जनता बाजार, इंदिरानगर, गोल्फ क्लब परिसर, रामटेकडी, तोलाराम टॉवर, कोकणनगर, नागेवाडी आणि छेडानगर या भागांमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे.

# कृषिप्रधान देशात शेतमालाला भाव मिळविण्यासाठी संघर्ष

**जयंत पाटलांची सरकारवर टीका**

■ मुंबई

**कृषिप्रधान** देशात शेतकऱ्यांना स्वतःच्या कष्टाने पिकविलेल्या शेतमालाला योग्य भाव मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याची खंत व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे.

याबाबत सामाजिक माध्यमावरील पोस्टमध्ये जयंत पाटील म्हणाले की, राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून बाजारात शेतमालाला हमीभावापेक्षाही कमी दर मिळत आहेत. त्यामुळे आंबा, काजू आणि कांदा उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात सापडले असून त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांना हक्काच्या भावासाठी संघर्ष करावा लागणे ही गंभीर व चिंतेची बाब आहे. पुढे सरकारवर निशाणा साधताना त्यांनी म्हटले की, शेतकऱ्यांच्या अनेक मागण्या प्रलंबित आहेत. त्यासाठी निधी नसल्याचे सांगितले जाते. दुसरीकडे राज्यावर कर्जाचा मोठा बोजा असतानाही जनतेची कोणतीही मागणी नसलेल्या अनेक अनावश्यक प्रकल्पांवर खर्च केला जात आहे.

# हमी भाव, पाणी वादावरून पंजाबात शेतकऱ्यांचे आंदोलन

■ नवी दिल्ली

**पंजाबमधील** मोहाली येथे काल हमी भाव, पाणी वाद तोडगा या आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी मोठ्या संख्येने शेतकरी रस्त्यावर उतरले होते. त्यामुळे पोलिसांनी शेतकऱ्यांना रोखण्यासाठी पाणी आणि अश्रुधूराचा मारा केला. मोठ्या संख्येने शेतकरी मोहालीच्या फेज-८ येथील नेचर पार्कमध्ये जमल्यानंतर पंजाब लोक भवनावर मोर्चा काढला होता. मात्र प्रशासनाने त्याला परवानगी दिली नव्हती.

संयुक्त किसान मोर्चाच्या बॅनरखाली एकत्र आलेल्या शेतकऱ्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत सरकार त्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला. शेतकरी मोहालीहून चंदीगड येथील पंजाब लोक भवनावर मोर्चा नेत होते. मात्र चंदीगड पोलिसांनी त्यांना मोहाली-चंदीगड सीमेवरच अडवले. शेतकरी पुढे जाण्याचा प्रयत्न करू लागल्यानंतर पोलिसांनी त्यांना पांगवण्यासाठी अश्रुधूराच्या नळकांड्या फोडल्या आणि पाण्याच्या तोफांचा वापर केला. त्यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. शेतकऱ्यांचा आरोप आहे की, केंद्र सरकार विविध कायदे आणि दुरुस्त्यांच्या माध्यमातून पंजाबच्या जलहक्कांमध्ये हस्तक्षेप करत आहे. भाखरा ब्यास मॅनेजमेंट बोर्ड नियमांतील बदल, डॅम सेफ्टी ॲक्ट, वॉटर अमेंडमेंट ॲक्ट २०२४ आणि पंजाब पुनर्गठन कायद्याद्वारे राज्याच्या पाण्यावर नियंत्रण वाढवले जात आहे.

**शेतकऱ्यांवर पाणी आणि अश्रुधूराचा मारा**

शेतकरी नेते प्रेम सिंह भंगू यांनी सांगितले की, नदी पाणी वादाचा तोडगा 'रिपेरियन बेसिन तत्त्वा'च्या आधारे काढला जावा. तसेच पंजाब पुनर्गठन कायदा १९६६ मधील कलम ७८,७९ आणि ८० रद्द करण्याची मागणी त्यांनी केली. पंजाबमधील कालवा व्यवस्थेची पुनर्बांधणी आणि गाळ काढण्याच्या कामासाठी केंद्र सरकारने विशेष आर्थिक पॅकेज द्यावे, अशीही मागणी त्यांनी केली.

# आमदार बच्चू कडूंचे १९ मे चे आंदोलन रद्द

■ मुंबई

**दिव्यांग** बांधवांच्या मानधनासंदर्भातील शासन निर्णयावरून उद्भवलेला वाद अखेर निवळला आहे. त्यामुळे मंगळवार १९ मे रोजी मंत्रालयात होणारे शिंदे गटाचे आमदार बच्चू कडू यांचे आंदोलन रद्द करण्यात आले आहे. बच्चू कडू यांनी दिव्यांगांसाठी काढलेल्या जीआरवर तीव्र नाराजी व्यक्त करत आंदोलनाचा इशारा दिला होता. यूटीआय कार्ड मिळेपर्यंत पगार देऊ नये हा निर्णय चुकीचा असून तो तातडीने रद्द करावा, अशी त्यांची मागणी होती. दरम्यान, या दोन जीआरमुळे सुमारे ५० टक्के दिव्यांग बांधव मानधनापासून वंचित राहत असल्याची बाब उघड झाली होती. यामुळे राज्यभरातून नाराजी व्यक्त होत होती.

# जंजिरा किल्ल्यावर प्रवासी जेट्टीचे लोकार्पण


■ मुरुड

**रायगड** जिल्ह्यातील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांसाठी बांधण्यात आलेल्या अत्याधुनिक प्रवासी जेट्टीचे लोकार्पण खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. सुमारे १११ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेली ही जेट्टी पर्यटकांच्या सोयीसाठी महत्त्वाची ठरणार आहे. या कार्यक्रमावेळी राज्याचे बंदरे व मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी कोकणातील जलपर्यटनाच्या विकासाबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली.



नितेश राणे म्हणाले की, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे तीन किनारी जिल्हे जलमार्गाने जोडण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असून, यासाठी केंद्र शासनाकडून निधी मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहे. कोकणात दरवर्षी लाखो पर्यटक भेट देत असल्याने जलमार्ग विकसित झाल्यास प्रवासाचा वेळ वाचेल आणि पर्यटनाला मोठी चालना मिळेल. तसेच कोकणातील सुमारे ८७७ किलोमीटर लांबीच्या समुद्रकिनाऱ्याच्या सुशोभिकरणासाठी नियोजन सुरू आहे. पद्मदुर्ग किल्ल्याच्या विकासासाठीही निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## नवाकाळ शब्दकोडे-१६०८



**आडवे शब्द –**

१. झाकलेले, लपेटलेले ५. सरपटणारा महाकाय प्राणी ८. अमावास्या १०. कलाकाराला दिलेले मानधन १२. मावळती १३. माजलेला १४. परिमार्जन १६. देवालय १७. एकाग्र नजर १८. शेवट १९. ज्याप्रमाणे २०. खोटारडा, थापाड्या २१. लग्नासाठी केली जाणारी कपड्यांची घाऊक खरेदी २२. मारूतीचे शस्त्र २३. कविता करणारा २४. पुष्परस २५. यशस्वी २७. राखणदार २९. वणवा ३२. आलिंगन ३३. लहान मुलींची कर्णभूषणे ३५. नस्ते उद्योग करणारी ४०. राजवाडा ४२. हसणे ४३. खराब ४४. पळवून नेणे ४६. उपमर्द ४७. अभिप्राय ४८. पावलांचा आवाज ५०. दरवाजा ५१. अंगी अनेक कौशल्ये असलेला ५३. अधोगती ५४. कपटी ५५. हाक ५७. युवक ५९. लाकूड कापण्याचे साधन ६२. निर्मिती ६३. स्पर्धेत बक्षीस मिळालेला चषक ६६. ज्ञात ६७. हुद्दा ६८. धान्याचे चूर्ण ७०. पंजाबी नृत्यप्रकार ७१. प्रियजनांविषयी वाटणारी नाहक चिंता ७४. अरिष्ट ७५. सत्त्व ७७. पळून गेलेला ७९. उदी, राख ८२. चहाचा पेला ८५. प्रीती, प्रेम ८९. 'नको देवराया, अंत असा पाहू....' (संत कान्होपात्रा) ९१. शिजवलेली तुरीची डाळ ९२. लाल रंगाचे कडधान्य ९४. गुद्दा ९५. लाल रंगाचे मूल्यवान रत्न ९८. सजग, दक्ष १०१. आकाश १०३. ताकद १०४. कमी वेळात १०५. हुक्की, सेवनाची तीव्र इच्छा १०६. गाढ (निजलेला) १०७. सहापैकी चैत्रातला ऋतू

**उभे शब्द –**

१. आपटून फोडला जाणारा फटाका २. विंचू, ज्योतिषातील एक रास ३. अंधःकार ४. सर्वजण ५. वाजवीहून जास्त ६. नाचगाण्याचा कार्यक्रम ७. राखी पौर्णिमा ८. आळस नसलेला, उद्योगी ९. समजूतदार १०. अकबराचा चतुर दरबारी ११. गाणे १५. माळ १८. कोर्ट २२. रानरेडा २३. शेळीचे पिल्लू २४. नेमस्त, सौम्य २६. सोटा २८. प्रसादात वापरली जाणारी साखर ३०. युद्ध ३१. चष्मे व दुर्बिणीत वापरली जाणारी काच ३२. आखूड, तोकडा (इं.) ३४. बाल्य, शैशव ३६. अस्थिर ३७. विष ३८. विश्वास ३९. उणीव, ददात ४१. उलट, अनपेक्षित ४३. वायू, वैताग ४५. नवनाथांपैकी एक ४६. भोजन, भोज्य पदार्थ ४७. दुसऱ्याच्या मनातले विचार न सांगता ओळखणारा ४९. फुलाची पाकळी ५१. दुष्कृत्यातील साथीदार, सेवक ५२. धुमाकूळ, दंगा ५४. क्षमता ५६. घमघमाट ५८. चांदी ६०. ताकद ६१. अंगठीत रत्न जडवण्याची जागा ६४. नाट्यकलाकार ६५. वानर ६६. पाहुणचार ६७. पद्धती, रीती, प्रकार ६९. लुच्चा ७१. प्रत्येक ७२. गुरांना बांधायचा दोर ७३. जिव्हा ७६. कसदार ७८. शंकर-पार्वतीच्या कहाणीत उल्लेख असलेला सोंगट्यांचा खेळ ८०. लक्षात ठेवण्याची क्षमता ८१. चोळीचे कापड ८३. डोंगर ८४. भुंग्याची गुणगुण ८६. तोटा, हानी ८७. गुरांचे खाणे ८८. निराळा, खास ८९. नेक ९०. नुकसानी ९३. गर्दी ९६. हस्त ९७. कुस्तीत हरलेला ९८. स्वच्छ ९९. अद्दल १००. खेळातला सवंगडी १०२. संसार १०३. शंभर


•

**नवाकाळ कोडे क्रमांक १६०७ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. उलथापालथ ५. जहागीर ८. गैरवापर ११. सूप १२. पट १३. कव १५. लत १७. नजीक १९. वडवानल २१. राजेशाही २२. जवान २३. विराट २४. सीमा २५. नयन २६. निकाल २८. रासभ ३०. यक्ष ३१. गीत ३३. अनवाणी ३५. वरूण ३७. अचानक ४०. काळीज ४२. कीर ४३. मानस ४४. पटल ४५. वचपा ४६. लड्डु ४७. सहज ४९. वापर ५१. नावाडी ५३. नांदी ५६. रवाळ ५७. शची ५८. मद ५९. मिजास ६१. बाटगा ६२. राणीव ६४. हातोहात ६६. रमाबाई ६९. कक्ष ७०. पलंग ७१. लकेर ७२अ. अंबर ७२. क्षेत्रपाल ७३. समान ७५. वजीर ७६. रात्र ७७. पवित्र ७८. सुस्त ७९. चळत ८०. जाईजुई ८३. वणवा ८४. अलका ८६. गाजावाजा ८८. हवा ९०. भला ९१. किडूकमिडूक ९३. काळ ९५. जीव ९७. जानवे ९८. लुसलुशीत १००. धरणे १०२. डोंगर १०३. याग १०४. रीघ १०५. बडवा

**उभे शब्द** : १. उपजीविका २. थाप ३. पाटव ४. थकवा ६. हाल ७. गीतरामायण ९. रथ १०. परवानगी ११. सून १४. वनवास १६. खुशाल १८. कराल २०. डच्चू २२. जय २५. नवीन २६. निर्विकार २७. जानकी २८. राणी २९. भवन ३२. तळपायाची आग मस्तकाला जाणे ३४. वारस ३६. रुसवा ३७. अट ३८. चालना ३९. कवडी ४१. जलदी ४३. माज ४४. परवाना ४८. हट्टी ५०. पर ५२. वारूणी ५३. नांदतो केवळ पांडुरंग ५४. दुजा ५५. चटईक्षेत्र ५८. महाल ५९. मित ६०. सरबराई ६१. बाबा ६२. राक्षसविवाह ६३. वपन ६५. हारजीत ६७. मार ६८. कपाळ ७४. मात्र ७६. राई ७७. पण ७८. सुलभ ८१. जुने ८२. भेजा ८३. वजा ८५. आमिष ८६. गाळ ८७. वाटसरू ८९. वाजी ९२. कजाग ९३. कावेरी ९४. नशीब ९६. वध ९९. तड १०१. रजा

---




## राशिभविष्य

**रविवार १७/०५/२०२६ ते शनिवार २३/०५/२०२६**

### मेष

**या** आठवड्यात अनेक ग्रहबदल झालेले आहेत. तुमचा राशीस्वामी मंगळ तुमच्याच राशीत आल्यामुळे तुमच्यामध्ये ऊर्जा व आत्मविश्वास तुम्हाला जाणवेल. काही बंधने स्वतःवर घालून घेतली तर अनेक गोष्टी, कामे साध्य करता येतील. वेळच्या वेळी निर्णय घेऊन कृतीला प्राधान्य द्या. घाईगडबडीत घेतलेले निर्णय त्रासदायक ठरतील. अतिआक्रमक वृत्ती, हट्टीपणा यावर नियंत्रण ठेवा. आर्थिक स्थिती सर्वसाधारण चांगली राहील. बचत सांभाळण्यासाठी अनावश्यक खर्चाला कात्री लावा. बोलताना सौम्यपणे बोला. तुमच्या बोलण्यामुळे समोरचा दुखावू शकतो.

घरामधील वातावरण संमिश्र राहील. कौटुंबिक समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक ठरेल. तुमची भूमिका सगळ्यांना पटवून द्यावी. जोडीदाराच्या आरोग्याची काळजी घ्यावी. संततीशी विनाकारण मतभेद होऊ शकतात.

सरकारी क्षेत्र, स्पर्धात्मक परीक्षा यामध्ये यश मिळेल. तुम्ही आधी भरलेल्या निविदा, टेंडर यामुळे फायदा होऊ शकतो. नोकरीतील बदल विचारपूर्वक करा. नोकरदारांना स्वतःचे कौशल्य सिद्ध करता येईल.
आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका.
**शुभ दिनांक** : १९, २०.

### वृषभ

या आठवड्यात तुम्हाला परिस्थितीमध्ये चढउतार जाणवतील. आर्थिक गणिते जुळवता येतील. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. आत्मविश्वास चांगला राहील. अतिव्यवहारीपणा दाखवू नये. मंगळासारखा ग्रह व्ययस्थानी असल्यामुळे प्रत्येक कृती सावधगिरीने करावी. घाईगडबडीत, अति उत्साहात निर्णय घेऊ नका. स्वतःची क्षमता ओळखून त्याप्रमाणे कृती करावी. नवीन ज्ञान, तंत्रज्ञान शिकाल. आर्थिक गुंतवणूक अनुभवी तज्ज्ञांच्या सल्ल्याने करावी.

घरच्या जबाबदाऱ्या पूर्ण करता आल्यामुळे तुमच्याबद्दल आदर वाढेल. संततीसाठी मोठे निर्णय घ्यावे लागतील. घरामध्ये अलिप्त धोरण ठेवावे लागेल. समस्या चतुराईने हाताळाव्यात. वडिलोपार्जित संपत्तीबाबत वाद असल्यास सुसंवादाने मिटतील.

कार्यक्षेत्रामध्ये अचानक काही सकारात्मक घटना घडतील. मात्र कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. योग्य ठिकाणीच धडाडी दाखवावी. प्रवासामुळे फायदा होईल. नोकरदारांनी संयम राखणे अतिशय आवश्यक राहील. वरिष्ठांच्या सल्ल्याने तुमच्या योजना प्रत्यक्षात आणता येतील. प्रतिष्ठा जपा.
**शुभ दिनांक**. १८,२१

### मिथुन

**या** आठवड्यात संमिश्र ग्रहमान असणार आहे. स्वतः वर बंधने घालून घ्या. मंगळाचे राशी परिवर्तन तुमच्यासाठी लाभ देणारे ठरणार आहे. आजूबाजूच्या परिस्थितीचे योग्य अवलोकन करावे. नियोजनबद्ध व विचारपूर्वक कृती केल्यास यश नक्की मिळणार आहे. आर्थिक ओघ चांगल्या प्रकारे सुरू राहील. गुंतवणूक करताना मात्र सावध राहा. आठवड्याच्या शेवटी मिळणारी संधी काळजीपूर्वक स्वीकारा. प्रगतीचे मार्ग खुले होतील.

घरापासून लांब जावे लागल्यामुळे कुटुंबासाठी आवर्जून वेळ द्यावा लागेल. संततीशी मतभेद टाळा. त्यांचे हट्ट पुरवावे लागतील. जोडीदाराचे उत्तम सहकार्य मिळेल. घरातील ज्येष्ठांच्या विशेषतः आईच्या आरोग्याची चिंता राहील. मित्रपरिवाराचा पाठिंबा उपयुक्त ठरेल. कार्यक्षेत्रामध्ये जास्त प्रयत्न व कष्ट करावे लागतील. भागीदारीतील व्यवसाय यशस्वी ठरतील. जुने अडकलेले पैसे परत मिळू शकतात. व्यावहारिक बोलणी करताना मुद्देसूद व सौम्यपणे बोला. अतिधाडसीपणा टाळावा. स्वतःची प्रतिष्ठा सांभाळावी. नोकरदारांना वरिष्ठांचे उत्तम सहकार्य मिळेल. सहकाऱ्यांशी वादविवाद टाळावेत.
**शुभ दिनांक** : १९, २०.

### कर्क

**मन** स्थिर ठेवून कामाचे नियोजन करावे. अनेक अडकलेली कामे मार्गी लागणार आहेत. मानसिक अस्वस्थता हळूहळू कमी होईल. संयम व थोडे धाडस दाखवून कामाची गती वाढवावी. आर्थिक लाभाचे प्रमाण वाढणार आहे. मात्र विनाकारण खर्चावर नियंत्रण ठेवा. कर्जफेडीला प्राधान्य द्यावे. भावना व व्यवहारीपणा याचा समन्वय साधा.

कुटुंबामध्ये असलेले गैरसमज, दुरावा यावर उपाययोजना करता येतील. गृहसजावट, दुरुस्ती यासाठी खर्च कराल. तुमची आक्रमक वृत्ती नियंत्रणात ठेवून कुटुंबाशी सुसंवाद राखावा. जोडीदार व संतती यांची प्रगती समाधान देईल. नवीन वास्तुचा योग आहे. मित्रपरिवाराशी सध्या जेवढ्यास तेवढे नाते ठेवावे. भावंडांमुळे नवीन संधी मिळतील. कार्यक्षेत्रामध्ये परिस्थितीप्रमाणे धोरणात्मक बदल करावे लागतील. वाढलेली जबाबदारी योग्य रीतीने तुम्ही पार पाडाल. बढतीचे योग आहेत. आवश्यक तिथे नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. त्या दृष्टीने हा काळ योग्य आहे. नोकरदारांना नियम पाळून प्रयत्न, कष्ट वाढवावे लागतील. मानसिक आरोग्य जपावे.
**शुभ दिनांक** : १८, २१.

### सिंह

**हा** आठवडा एकंदरीत चांगला जाणार आहे. राशीस्वामी रवीचे कर्मस्थानातील भ्रमण अत्यंत लाभदायक ठरेल. भाग्याची साथ असल्यामुळे तुमच्या प्रयत्नांना यश मिळणार आहे. येणारे अडथळे, समस्या यावर तुम्ही मात कराल. आव्हानात्मक परिस्थितीमध्ये आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. आर्थिक स्थिती चांगली राहील. बचतीसाठी योग्य मार्ग निवडा. आर्थिक गुंतवणूक अनुभवी तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करावी. योग्य निर्णय व कृती होण्यासाठी उत्साह वाढवावा लागेल.

कुटुंबामधील समस्या हळूहळू कमी होतील. अलिप्त वृत्तीने काही धाडसी व महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील. संतती व जोडीदाराच्या दृष्टीने चांगला काळ आहे. संततीची शैक्षणिक प्रगती होण्यासाठी धावपळ करावी लागेल. मित्रांचा सहभाग उपयुक्त ठरेल. कार्यक्षेत्रामध्ये संयमाने विरोधकांवर मात करता येईल. स्पर्धात्मक परिस्थितीमध्ये यश मिळेल. तुमचा अनुभव व योग्य नियोजन उपयोगी ठरेल. कामामध्ये सातत्य ठेवून योग्य संधीची वाट पाहावी. नोकरदारांना वरिष्ठांच्या सहकार्याने स्वतःचे कौशल्य, क्षमता सिद्ध करता येईल. व्यावसायिकांना काही सकारात्मक बदल करता येतील.
**शुभ दिनांक** : १८, १९, २३.

### कन्या

आठवड्याचा मध्य महत्त्वाच्या कामांसाठी योग्य राहील. आठवड्याची सुरुवात व अखेर मनासारखी असणार नाही. संयम ठेवावा लागेल. भाग्याची साथ चांगली राहील. बोलताना समोरचा दुखावला जाणार नाही यासाठी विशेष काळजी घ्यावी. आर्थिक स्थिती चांगली राहील. संचित धन स्थिर राहील. आत्मविश्वास डळमळीत होऊ शकतो. स्वतःवर विश्वास ठेवा. चिकित्सकपणा बाजूला ठेवून कृतीला महत्त्व द्यावे. विरोधक हालचाली वाढवणार आहेत. सावधगिरी बाळगावी.

घरची आघाडी चांगली असेल. वारसाहक्काने मिळणाऱ्या स्थावर संपत्तीबाबत यशस्वी तोडगा निघेल. जोडीदार व संतती यांचा तुमच्या कार्यातील सहभाग उत्साह वाढवेल. मात्र कौटुंबिक सदस्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. भावंडांच्या मताला डावलू नये.

कार्यक्षेत्रामध्ये आर्थिक अंदाज थोडे चुकू शकतात. त्यामुळे व्यावहारिक निर्णय घेताना तज्ज्ञांचा सल्ला घेणे व सावधगिरी बाळगणे अति आवश्यक आहे. नवीन संधी येतील. परंतु त्याचा लगेच उपयोग होणार नाही. भविष्यातला विचार करून निर्णय घ्यावा. नोकरदारांना वरिष्ठांचे सल्ले उपयोगी ठरतील. सहकाऱ्यांशी मतभेद होऊ शकतात.
वाहन चालवताना काळजी घ्या.
**शुभ दिनांक** : १८, १९, २०.

### तूळ

**आठवड्याचा** उत्तरार्ध तुमच्यासाठी चांगला ठरेल. सुरुवातीला थोडे अडथळे जाणवतील. तुमचा राशीस्वामी शुक्र बलवान स्थितीत आहे. नियोजित कार्य साध्य होण्यासाठी पुन्हा प्रयत्न करा. नवीन गोष्टी, तंत्रज्ञान शिकण्याकडे तुमचा कल राहील. योग्य दिशेने, योग्य वेळी प्रयत्न करण्याचे धोरण ठेवा. आर्थिक नियोजन गरजेचे आहे. मोठी गुंतवणूक सध्या टाळा.

घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. तुमच्या पुढाकारांनी कौटुंबिक समस्या सोडवता येतील. जोडीदाराचे वर्चस्व मान्य करा. मतभेद होऊ देऊ नका. मुलांच्या भवितव्यासाठी अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्याने आर्थिक नियोजन करावे लागेल.

उद्योगव्यवसायात अडथळे आले तरीही सकारात्मक गोष्टीही घडणार आहेत. माणसांची योग्य पारख करावी. सामाजिक व कला क्षेत्रात काम करणाऱ्यांना चांगला काळ आहे. नोकरदारांच्या कष्टामध्ये वाढ होणार आहे. केलेल्या कामाचे कौतुक होईल. व्यावसायिकांनी जुनी येणी वसूल करण्याच्या दृष्टीने प्रयत्न वाढवावेत.

आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. वेळीच उपाययोजना करा.
**शुभ दिनांक** : २१, २३.

### वृश्चिक

**आठवड्याची** सुरुवात चांगली होईल. मध्ये अडथळे आले तरी अखेरीला कार्यसिद्धी झालेली असेल. तुमचा राशीस्वामी मंगळ स्वराशीमध्ये आहे. तुमची ऊर्जा व धाडसी वृत्ती वाढणार आहे. याला योग्य दिशा दिल्यास अनेक गोष्टी उत्तम रीतीने पार पाडता येतील. सध्याची ग्रहरचना पाहता आक्रमक व झटपट निर्णय घेण्याची वृत्ती नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहे. आर्थिक स्थिती सर्वसाधारणपणे चांगली राहील. भाग्य साथ देणार असले तरी मोठी गुंतवणूक करणे पुढे ढकला.

घरामध्ये विनाकारण मतभेद, गैरसमज होऊ देऊ नका. जोडीदाराचा सल्ला, मत विचारात घ्यावे. वर्चस्व जाणवेल. आई, मुलांच्या व जोडीदाराच्या आरोग्याकडे लक्ष द्या. मित्रपरिवाराचा पाठिंबा मिळेल. अविवाहितांचे विवाह ठरण्याच्या दृष्टीने बोलणी सुरू होतील.

उद्योगव्यवसायात परिस्थितीनुसार कार्यशैली बदलावी लागेल याची तयारी ठेवा. अभ्यासपूर्ण नियोजन व पर्यायी व्यवस्था यामुळे यश मिळेल. भागीदाराचे निर्णय मान्य करा. नोकरदारांनी बुद्धीचातुर्याने कर्तबगारी दाखवून द्यावी. स्पर्धात्मक वातावरण राहील.
**शुभ दिनांक** : १८, २३.

### धनु

**आठवड्याचा** पूर्वार्ध महत्त्वाच्या कामांसाठी चांगला ठरेल. लाभाचे प्रमाण वाढेल. समाधानी व आनंदी वृत्ती राहील. इच्छाशक्ती व नियोजन यामुळे ठरवलेल्या गोष्टी पार पाडता येतील. कुठल्याही मोहात अडकू नका. दिशाहीन प्रयत्न होणार नाही याकडे लक्ष द्यावे. ध्येय ठरवून त्याप्रमाणे कृती करा. हातून चुका होणार नाही यासाठी सावध राहावे. मंगळामुळे धाडसी वृत्ती वाढणार आहे, तिला संयमाची जोड द्यावी. आर्थिक आवक चांगली असली तरी बचतीसाठी अनावश्यक खर्चाला लगाम घाला. मौजमजेकडे कल राहील.

मुलांचे हट्ट पुरवावे लागतील. त्यांची प्रगती समाधान देणार आहे. जोडीदाराशी बोलताना अहंकार बाजूला ठेवा. नाहीतर दुरावा निर्माण होईल. प्रेमीजनांची विवाहाची बोलणी पुढे सरकतील. मित्रपरिवाराची मदत मिळेल. भावंडांशी मतभेद होऊ शकतात.

घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी घ्यावी. कार्यक्षेत्रामध्ये कार्यपद्धतीत परिस्थितीनुसार बदल करावे लागतील. अचानक मिळणाऱ्या संधीसाठी तयार राहावे. नोकरदारांनी स्वतःची प्रतिमा सांभाळावी. सरकारी कामांमध्ये यश मिळेल. नवीन तंत्रज्ञान, माहितीच्या आधारे व्यवसायवृद्धी करू शकाल.
**शुभ दिनांक** : १८, १९, २०.

### मकर

**आठवड्याचा** मधला काळ महत्त्वाच्या कामांसाठी चांगला ठरणार आहे. आठवड्याच्या सुरुवातीला मौजमजेकडे कल असल्यामुळे कामाबाबत चालढकल होऊ शकेल. परंतु ध्येयाकडे दुर्लक्ष करू नये. कामाची गती वाढवावी लागेल. आधी झालेल्या चुका ओळखून त्यावर उपाययोजना करावी लागेल. प्रवासाचे योग आहेत. इच्छाशक्ती, महत्त्वाकांक्षा वाढणार आहेत. त्या पुऱ्या करण्याच्या दृष्टीने प्रयत्न वाढवावेत. स्वावलंबन महत्त्वाचे ठरेल. अतिभावनाशील, संवेदनशील होणे टाळावे.

आर्थिक स्थितीमध्ये अनपेक्षित चढ-उतार जाणवतील. घरामध्ये शांत वातावरण ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. जोडीदार व मित्रपरिवाराशी मतभेद टाळून सुसंवाद ठेवा. संततीच्या बाबतीत भाग्यशाली घटना घडेल.

नोकरीव्यवसायात जबाबदारी वाढल्यामुळे कामाचा ताण जाणवेल. योग्य दिशेने प्रयत्न करा. सहकारी, नोकरवर्ग यांच्याशी सामंजस्य ठेवावे लागेल. रागावर नियंत्रण ठेवावे. विश्वासू व्यक्ती ओळखा. नवीन संधी गमावू नका.
**शुभ दिनांक** : १८, १९, २१.

### कुंभ

**आठवड्याचा** उत्तरार्ध चांगला व ध्येयपूर्तीचा ठरेल. काही प्रमाणात अडथळे कमी होतील. पूर्ण माहिती मिळाल्याशिवाय तुम्ही निर्णय घेत नाही, या सवयीचा आता उपयोग होईल. घाईगडबडीत निर्णय घेणे टाळा. मात्र उशीरही नको. मानसिक गोंधळ, नैराश्य नियंत्रणात ठेवता येईल. अनेक आघाड्यांवर लक्ष द्यावे लागल्यामुळे तारांबळ उडणार आहे. मदतीसाठी योग्य व्यक्तींचा विचार करून ठेवा. बोलताना काळजीपूर्वक व सौम्यपणे बोला. आर्थिक आवक वाढली तरी आर्थिक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. छोटे समारंभ साजरे झाल्यामुळे आनंदी वातावरण राहील. वास्तु किंवा आईमुळे लाभ होण्याची शक्यता आहे. मुलांबरोबर, जोडीदाराबरोबर आनंदात वेळ घालवाल.

कार्यक्षेत्रामध्ये सावध राहणे योग्य ठरेल. कुठल्याही समस्येवर तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच उपाययोजना करावी. नोकरदारांनी हितशत्रूंपासून सावधगिरी बाळगावी. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. व्यावसायिकांना नवीन संधीचा लाभ घेता येईल.
**शुभ दिनांक** : २१, २३.

### मीन

आठवड्याची सुरुवात व अखेर मनासारखी, ध्येयपूर्तीचे ठरेल. मधला काळ थोडा काळजीचा व संयम ठेवण्याचा आहे. अनेक आघाड्यांवर लक्ष द्यावे लागल्यामुळे विनाकारण मानसिक दडपण जाणवेल. नैराश्य येऊ देऊ नका. कामानिमित्त प्रवास करावा लागेल. भावनाशील होणे हा तुमचा स्थायीभाव त्रासदायक ठरू शकतो. व्यावहारिक निर्णय घेणे टाळू नका. आर्थिक स्थिती चांगली राहील. संचित धन वाढेल.

घरामध्ये धार्मिक तसेच आनंदी वातावरण राहील. साडेसातीचा परिणाम करून घेऊ नका. कौटुंबिक मतभेद चर्चेने सुटतील. मुले व जोडीदाराबरोबर सहलीचे नियोजन होईल. मुलांशी वाद टाळावे. कौटुंबिक व्यवसायात यश मिळेल.

कार्यक्षेत्रामध्ये विरोधकांचे प्राबल्य जाणवेल. कुठल्याही स्थितीत हातची संधी सोडू नये. आवश्यकतेनुसार पुन्हा प्रयत्न करा, यश मिळेल. प्रवासामुळे फायदा आहे. नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाजू विसरू नका. नोकरदारांना केलेल्या कामाचे श्रेय मिळेल. खाण्यापिण्याचे पथ्य पाळावे. मानसिक स्थैर्य सांभाळा.
**शुभ दिनांक** : १८, २३.

– ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे

नवाकाळ

• पुणे | रविवार १७ मे, २०२६ • पान -८

# मनी लॉंड्रिंग प्रकरणी रॉबर्ट वड्रा यांना जामीन



**नवी दिल्ली -** दिल्लीच्या राऊज ॲव्हेन्यू जिल्हा न्यायालयाने शिकोहपूर जमीन खरेदी व्यवहारात झालेल्या कथित गैरव्यवहारप्रकरणी दाखल मनी लॉंड्रिंगच्या गुन्ह्यात काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांचे पती, उद्योजक रॉबर्ट वड्रा यांना जामीन मंजूर केला. अंमलबजावणी संचलनालयाने (ईडी) वड्रा यांच्यावर मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायद्यान्वये खटला दाखल केला आहे. मात्र त्यांना अटक केलेली नाही. विशेष न्यायाधीश सुशांत छांगोत्रा यांनी वड्रा यांना ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक जात मुचलक्यावर जामीन मंजूर केला. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून आज या प्रकरणी सुनावणी झाली. वड्रा यांनी ईडीने नोंदवलेल्या गुन्ह्यालाच आव्हान दिले आहे.

# मुस्लिमोफोबिया
## एक भयानक मानसिक आजार

**एक सरकारी उच्चपदस्थ अधिकारी रिटायर झाले. साधा सरळ माणूस. कुणाच्याही अध्यात मध्यात न पडणारा सरळमार्गी. रिटायर झाल्यावर घरी बसून काय करायचे? म्हणून ते टीव्ही बघायचे. नंतर त्यांना टीव्हीवरील न्यूज बघायची सवय लागली. विशेष करून ते हिंदी न्यूज चॅनल्स बघायचे. मात्र या दरम्यान त्यांच्यामध्ये भयंकर नकारात्मक बदल होत गेले. हे त्यांच्या मुलाच्या लक्षात आलं.**



**डॉ. शिरीष राजे**
मानसशास्त्रज्ञ

**सगळ्यांविषयी** चांगलं बोलणारे हे गृहस्थ मुस्लिमांविषयी मात्र अचानक अत्यंत नकारात्मक झालेले होते. मुस्लिमांची संख्या वाढत चालली आहे, मुस्लीम आतंकवादी असतात, त्यांच्यामुळे आपल्या धर्माला धोका आहे. असं प्रत्येकाकडे ते वेड्यासारखं बडबडत असतात... असं त्यांचा मुलगा म्हणाला..

विशेष म्हणजे, एकदा त्यांची सून त्यांना म्हणाली बाबा, माझ्यासोबत चला. बाजारात जावून फळं घेऊन येऊ. तर ते म्हणाले नको. तिकडे मुस्लीम वस्ती आहे. एक प्रकारची भयंकर दहशत त्यांच्या मनात निर्माण झाली होती. भीती आणि असुरक्षितता त्यांना पोखरत चालली होती.

त्यांचा मुलगा त्यांना माझ्याकडे घेऊन आला. मी त्यांना त्यांच्या घरातला इडियट बॉक्स (टीव्ही) काढून टाकायला सांगितले. इतर छंद जोपासा, बाहेर पडा, लोकांशी बोला असं प्रेमाने त्यांना खूपच समजावून सांगितले. त्यांनी टीव्ही बंद केला तसे ते हळूहळू पुन्हा पूर्ववत होत गेले.

यावरून न्यूज चॅनल्समधून काय भयानक कंटेंट सध्या माणसांच्या डोक्यात घुसवण्यात येत आहे हे लक्षात येते.

दुसरी घटना एका गावातील. त्या छोट्याशा गावात एकही मुस्लीम घर नाही, पण गावातील एक बेरोजगार तरुण मात्र भर चौकात एकदा मुस्लिमांना नाहक शिव्या घालत होता. यांच्यामुळे आपल्या देशाचा विकास होत नाहीये, आपला धर्म धोक्यात सापडला आहे, एका राजकीय पक्षाने यांचे खूप लाड केले म्हणून हे दिवस आले आहेत असं बरंच काही.

त्याच्या घरी टीव्ही नव्हता. मग त्याला ही माहिती कुठून मिळते हे विचारल्यावर समजले की, काहीच कामधंदा नसल्याने २४ तास मोबाईलवर तो असतो, व्हॉट्सॲपवर व्हिडिओज बघतो..

यामध्ये गमतीचा भाग म्हणजे ते रिटायर्ड गृहस्थ व हा तरुण या दोघांचा मुस्लीम लोकांशी संबंध बिलकूल नसल्यासारखाच.

तरीही त्यांनी मुस्लिमांविषयी मनात भयंकर द्वेष, भीती आणि असुरक्षितता निर्माण करून घेतली होती.

मी एक मानसशास्त्रज्ञ आहे. त्यामुळे प्रत्येक विषयावर संशोधन करून तो विषय व्यवस्थित समजून घेणे मला आवडते.

या दोघांच्या बोलण्यात एक कॉमन गोष्ट होती ती म्हणजे 'एका राजकीय पक्षाने मुस्लिमांचे लाड केल्यामुळे आज मुस्लिमांची संख्या वाढत आहे त्यांच्यामुळे आपल्या धर्माला धोका निर्माण झाला आहे'वगैरे वगैरे.

दुसरं - यावर तोडगा म्हणजे एका विशिष्ट राजकीय पक्षाला समर्थन देऊन ही समस्या आपण संपवू शकतो. त्या पक्षाचा एक महान नेता आहे. त्याच्या पाठीमागे आपण उभे राहायला हवे.

त्याला समर्थन दिले तर तो आपल्या धर्माला मुस्लिमांपासून वाचवू शकतो. शिवाय तो कशाप्रकारे मुस्लिमांना धडा शिकवत आहे याबाबतचे वेगवेगळे न्यूज, लेख आणि व्हिडिओ त्यांच्यापर्यंत पोहोचतात हे ही मला कळले.

शेवटी मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो की, एका राजकीय पक्षाने राजकारणात यश मिळवण्यासाठी माध्यमांना आपल्या हाताशी धरून सामान्य लोकांना मानसिक आजारी बनवण्याचा सपाटाच लावला आहे.

एक अनामिक भीती न्यूज चॅनल्स, व्हॉट्सॲप आणि विविध माध्यमांमधून सतत त्यांच्या मनात निर्माण केली जात आहे. मुस्लीम धर्माविषयी त्यांच्या मनात द्वेष निर्माण करून त्यांना अक्षरशः हिंसक झोंबी बनवले जात आहे.

म. गांधी यांनी नकारात्मकतेवर सर्वात सुंदर उपाय सुचवला होता.

वाईट बोलू नका, वाईट बघू नका, वाईट ऐकू नका.

याचे कारण तुम्ही तुमच्या मेंदूला ज्या प्रकारचे खाद्य देतात तो तसाच होत जातो.

माहिती कितीही खोटी असली तरी ती सतत मेंदूमध्ये घुसवली तर मेंदूला ती खरी वाटायला लागते असं सायकॉलॉजी सांगते.

सध्या असे किती तरी साधे, निरागस लोक मुस्लिमोफोबियाला बळी पडत आहेत.

एकदा ओळखीच्या एका ज्येष्ठ मुस्लीम व्यक्तीशी मी संवाद साधला. त्यांना गमतीने म्हणालो, तुम्हाला माहीत आहे का, तुमच्यामुळे आम्ही धोक्यात आहोत म्हणून.

ते खळखळून हसले. म्हणाले बेटा आज भारतातील सर्वात मोठी समस्या बेरोजगारी आहे. माझा एक मुलगा ड्रायव्हर आहे. दुसरा मेकॅनिक आहे. दोघांची लग्न झाली आहेत. याचे कारण आमच्यामध्ये मुलगा धंदा करून पोट भरतो ना एवढेच बघितले जाते. मुलगा नोकरी करत नसला तरी चालतो.

आज खासगीकरण आणि कंत्राटीकरणामुळे रोजगार बुडालाय, तुमच्या धर्मात तर नोकरी असल्याशिवाय मुलाला मुलगी मिळत नाही. आता विचार करा नोकऱ्यांचे खासगीकरण आणि कंत्राटीकरण कोण करतंय??

आणि जर नोकरी नसल्यामुळे तुमच्या मुलांना मुलगीच मिळत नसेल तर तुमचा धर्म पुढे कसा वाढेल?

याचा अर्थ तुमचा धर्म तुमच्याचमुळे धोक्यात आला आहे.

कुणामुळे आला आहे याचा विचार तुम्हीच स्वतः करा. बेटा उगाच आमची भीती बाळगून काय फायदा?

यावरून हे लक्षात यावे की, ही 'डिस्ट्रॅक्ट पॉलिसी' आहे.

काही विशिष्ट लोकांच्या नावावर आपल्या देशातील सरकारी मालमत्ता केली जात आहे. त्यालाच आपण 'खासगीकरण' म्हणतो.

याकडे कुणाचे लक्ष जाऊ नये म्हणून बहुसंख्यांक समाजाचे लक्ष एका विशिष्ट प्लॅननुसार मुस्लिमांकडे वळवण्यात ते यशस्वी झाले आहेत.

हिंदुधर्मियांमधे अशा मानसिक आजारी लोकांची संख्या वाढतच राहिली तर आपला धर्म खरंच भयंकर धोक्यात आला आहे असंच भविष्यात दुर्दैवाने म्हणावे लागेल.

यावर उपाय एकच....

तर्क आणि विवेक वापरून विचार करणे आणि नकारात्मक माहितीपासून लांब राहणे...

हजारो वर्षांच्या आपल्या महान संस्कृतीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची 'सर्वसमावेशकताच' आहे हे विसरून कसे चालेल !!

# चेक बाऊन्स प्रकरणात ६ महिन्यांहून जास्त कारावास देऊ शकत नाही

■ मुंबई



**उच्च न्यायालयाचा निर्णय**

**महानगर** दंडाधिकारी चेक बाऊन्स प्रकरणात आरोपीने नुकसानभरपाई न दिल्यास त्याला ६ महिन्यांहून जास्त कालावधीची अतिरिक्त कारावासाची शिक्षा देऊ शकत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. कलम १३८ अंतर्गत चेक बाऊन्स प्रकरणांमध्ये हा अत्यंत महत्त्वाचा कायदेशीर निर्णय मानला जात आहे. न्या. एन. जे. जमादार यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला.

एका व्यापाऱ्याने आरोपी संचालक असलेल्या कंपनीला २२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचा माल पुरवला होता. हा व्यवहार पूर्ण करण्यासाठी दिलेले तब्बल ६० धनादेश (चेक) बँकेत वटले नाहीत. याप्रकरणी महानगर दंडाधिकाऱ्यांसमोर १७ वेगवेगळ्या तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. त्यावर दंडाधिकाऱ्यांनी आरोपीला प्रत्येक प्रकरणात १५ महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. तसेच न्यायालयाने आदेश दिलेली नुकसानभरपाई न भरल्यास प्रत्येक तक्रारीत आणखी १२ महिने अतिरिक्त कारावास भोगण्याचे आदेश दिले होते. या १२ महिन्यांच्या शिक्षेला आरोपीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. आरोपीच्या याचिकेवर न्यायमूर्ती जमादार यांनी सुनावणी करून निर्णय दिला.

# ब्रिटनच्या श्रीमंतांच्या यादीत हिंदुजांचे अव्वल स्थान कायम

■ लंडन

**ब्रिटनमधील** सर्वाधिक धनिकांच्या यादीत भारतीय उद्योजक कुटुंब हिंदुजांनी यावर्षीदेखील आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. टाईम्सने यंदाची श्रीमंतांची यादी जाहीर केली त्यातून ही बाब समोर आली आहे.

हिंदुजा कुटुंबातील गोपिचंद हिंदुजा यांचे गेल्या वर्षी निधन झाले. त्यानंतर त्यांचा वारसा त्यांचे पुत्र संजय आणि धीरज समर्थपणे चालवत आहेत. ३८ अब्ज पाऊंड संपत्तीसह हिंदुजा कुटुंबाने आपले अव्वल स्थान सलग पाच वर्षे कायम राखले आहे. हिंदुजा कुटुंबियांची ३८ देशांमध्ये गुंतवणूक आहे. डिजिटल तंत्रज्ञान, बँकिंग, अर्थविषयक सेवा, प्रकल्प विकास, रसायने, ऊर्जा, बांधकाम व्यवसाय, आरोग्य सेवा आणि शेअर ट्रेडिंग अशा विविध क्षेत्रांमध्ये हिंदुजा कुटुंबियांचा वावर आहे.

# एनटीए मुख्यालयासमोर 'एनएसयूआय'चे आंदोलन

■ नवी दिल्ली

**नीट-यूजी** परीक्षेतील पेपरफुटी आणि त्यामुळे परीक्षा रद्द झाल्याच्या निषेधार्थ एनएसयूआय या विद्यार्थी संघटनेने दिल्लीतील नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या (एनटीए) मुख्यालयासमोर आज पुन्हा आंदोलन केले.

नीट-युजी परीक्षा रद्द झाल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले, असा आरोप विद्यार्थ्यांनी केला. जोरदार घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांनी परिसर दणाणून सोडला. एनटीएच्या मुख्यालयावर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तसेच तीन थरांत बॅरिकेड लावण्यात आले होते. हे बॅरिकेड ओलांडून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

# आरजी कर प्रकरणी कर्तव्यात कसूर ३ वरिष्ठ आयपीएस अधिकारी निलंबित

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमध्ये पहिल्यांदाच सत्तेवर आलेल्या भाजपाने माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या कारकिर्दीत झालेल्या चुका सुधारण्याचा चंग बांधला आहे. नवनियुक्त मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी आर जी कर प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरची बलात्कार करून हत्या केल्या प्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत तीन वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे.

मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी आर जी कर प्रकरणी खात्यांतर्गत चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. प्राथमिक चौकशीत दोषी आढळलेले




कोलकाताचे माजी पोलीस आयुक्त विनीत गोयल, माजी पोलीस उपायुक्त इंदिरा मुखर्जी आणि अभिषेक गुप्ता या तीन अधिकाऱ्यांचे अधिकारी यांनी निलंबन केले आहे.

हे तिन्ही वरिष्ठ अधिकारी आर जी कर प्रकरणात तपासाची दिशा चुकवणे, पीडितेच्या कुटुंबियांना लाच देऊ करणे आणि अनधिकृतपणे पत्रकार परिषदा घेऊन लोकांची दिशाभूल करणे आदि गुन्ह्यांमध्ये दोषी आढळले आहेत. या खटल्याचा तपास सीबीआय करत असून राज्य सरकार तपासामध्ये ढवळाढवळ करणार नाही. ही केवळ खात्यांतर्गत झालेल्या चौकशीतून निष्पन्न झालेली बाब आहे, असे अधिकारी यांनी स्पष्ट केले.

# सुप्रीम कोर्टाचे कामकाज दोन दिवस व्हर्च्युअल

■ नवी दिल्ली

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत सर्वोच्च न्यायालयानेही आठवड्यातून दोन दिवस सुनावण्या व्हर्च्युअल म्हणजेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून घेण्याचा निर्णय घेतला आहे.

मध्य पूर्वेतील युद्धामुळे कच्च्या तेलाचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांनी पेट्रोल-डिझेलचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन देशवासीयांना केले आहे.

त्याला प्रतिसाद देत सोमवार आणि शुक्रवार असे आठवड्याचे दोन दिवस सर्व सुनावण्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घेतला आहे. त्याचबरोबर मंगळवार ते गुरुवार या दिवशी होणाऱ्या काही सुनावण्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे तर काही नेहमीच्या पध्दतीने प्रत्यक्ष न्यायालयात घेण्यात येणार आहेत. वकील आणि पक्षकारांच्या सोयीनुसार सुनावण्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग किंवा प्रत्यक्ष न्यायालयात घेण्यात येतील.

# कुंभमेळा रिंगरोडचा जमीन मोबदला खरातला ३ कोटी रुपये मिळणार

■ नाशिक

**नाशिकमध्ये** महिलांची फसवणूक आणि अत्याचार करणारा भोंदूबाबा अशोक खरात सध्या पोलीस कोठडीत आहे. त्याच्या गंभीर गुन्ह्यांची चौकशी सुरू असताना कुंभमेळा रिंगरोड प्रकल्पासाठी त्याच्या कुटुंबियांची जमीन संपादित केली जात आहे. या जमिनीची भरपाई म्हणून शासनाकडून खरातला तीन कोटी रुपये मिळणार आहेत.



आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी नाशिकमध्ये 'कुंभमेळा रिंग रोड' हा महत्त्वाचा प्रकल्प राबवला जात आहे. या प्रकल्पासाठी विविध भागांतील जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यात अशोक खरात आणि त्याच्या कुटुंबियांच्या मालकीच्या जमिनींचाही समावेश आहे. या भूसंपादनामुळे खरात कुटुंबाला मोठा आर्थिक लाभ होणार आहे. गुन्हेगारी प्रकरणांमुळे आधीच चर्चेत असलेल्या अशोक खरातला आता सरकारी मोबदल्याच्या रुपाने कोट्यवधींचा फायदा होणार असल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. गवळणे शिवारातील जमिनीच्या बदल्यात अशोक खरात आणि त्याची पत्नी कल्पना खरात यांना सुमारे ८२ लाख ८३ हजार रुपयांचा मोबदला मिळणार आहे.

# १ जून ते ३१ जुलैपर्यंत नौकांना समुद्रात मासेमारी करण्यास बंदी

■ रत्नागिरी

**महाराष्ट्र** सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अन्वये १ जून ते ३१ जुलै या कालावधीत राज्याच्या क्षेत्रीय सागरी जलधी क्षेत्रात यंत्रचलित आणि यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. सलग ६१ दिवस लागू राहणाऱ्या या बंदीचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय सा.वि. कुवेसकर यांनी केले आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाने स्पष्ट केले की, पावसाळ्यात मासळीच्या विविध प्रजातींचा प्रजनन काळ सुरू असतो. या काळात मोठ्या प्रमाणावर यांत्रिक पद्धतीने मासेमारी



झाल्यास मत्स्यसंपत्तीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्याच्या सागरी हद्दीत मासेमारी बंदी लागू करण्यात आली आहे. ही बंदी केवळ यंत्रचलित आणि यांत्रिक नौकांनाच लागू राहणार असून, पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचालित नौकांना त्यातून सूट देण्यात आली आहे. सध्या समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यांत्रिक नौकांनी १ जूनपूर्वी संबंधित मासेमारी बंदरात परतणे आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# नवी मुंबईत आफ्रिका-भारत बिझनेस सेंटर उभे राहणार

**२० एकर जागा राखीव**

■ नवी मुंबई

**महाराष्ट्राला** भारत-आफ्रिका व्यापाराचे जागतिक केंद्र बनवण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकत सिडको आणि आफ्रिका इंडिया इकॉनॉमिक फाऊंडेशन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. हा करार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत पार पडला. खारघर येथील आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्कमध्ये २० एकर जागेवर हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यात येणार आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि जेएनपीए बंदराच्या जवळ असल्याने या केंद्राला जागतिक व्यापारासाठी धोरणात्मक महत्त्व प्राप्त होणार आहे. या प्रकल्पासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष हेतू कंपनीत (एसपीव्ही) आफ्रिका इंडिया इकॉनॉमिक फाऊंडेशनचा ७४ टक्के आणि सिडकोचा २६ टक्के हिस्सा असेल. पुढील ५ ते ६ वर्षांत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा आहे. सहाव्या वर्षापर्यंत सुमारे ३० दशलक्ष अमेरिकन डॉलर महसूल मिळण्याचा अंदाज आहे.

**उत्तर प्रदेशमध्ये भीषण वादळामुळे पत्र्याच्या शेडसह हवेत सुमारे ५० फूट उंच फेकला गेलेला नन्हे खान आश्चर्यकारक वाचला. त्याने आपला हा थरारक अनुभव ऐकवताना सांगितले की, क्षणभर मला वाटले होते की, मी आता मरणार. पण सुदैवाने मी मक्याच्या शेतात जाऊन पडलो. शेतात पाणी होते. त्यामुळे माझा जीव वाचला.**

# वादळात ५० फूट उंच उडालेला नन्हे शेतात पडल्यामुळे वाचला

■ लखनौ

**उत्तर** प्रदेशमध्ये दोन दिवस मुसळधार पावसासह अनेक जिल्ह्यांना भीषण वादळाचा तडाखा बसला. यामध्ये



२४ तासांत १११ जणांचा मृत्यू झाला. वादळाचे भीषण रुप दाखवणारे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यामध्ये पत्र्याच्या शेडसह हवेत उंच उडालेल्या नन्हे खान यांचा व्हिडिओतर खूपच व्हायरल झाला. बरेली शहरापासून २२ किलोमीटर अंतरावर असलेल्या बामियाना गावातील हा व्हिडिओ आहे. नन्हे खान गावातील लग्नाच्या हॉलबाहेर उभारण्यात आलेल्या पत्र्याच्या शेडजवळ उभा होता. तेवढ्यात अचानक वादळ सुरू झाले. पत्र्याची शेड गदगदा हलू लागली. नन्हे खानला वाटले की, पत्रे हवेत उडून जातील म्हणून तो शेडच्या बांबूला पकडून उभा राहिला.

# अहमदाबाद विमान दुर्घटनेत कॅप्टन सभ्रवाल निर्दोषच

■ अहमदाबाद

**गुजरातच्या** अहमदाबाद येथे गेल्या वर्षी १२ जून २०२५ रोजी झालेल्या एअर इंडिया १७१ विमान दुर्घटनेप्रकरणी वैमानिक कॅप्टन सुमीत सभ्रवाल यांनी जाणीवपूर्वक विमानाचा अपघात केला असे कोणतेही संकेत मिळत नसून त्यांच्या बाबत बिनबुडाचा संशय व्यक्त केला गेला असे आता स्पष्ट होत आहे. कॅप्टन सभ्रवाल हे शेवटच्या क्षणापर्यंत विमान वाचवण्यासाठी प्रयत्न करत होते. विमानाचे इंजिन बंद पडल्याने निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीत त्यांनी नियंत्रण मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. या प्रकरणातील महत्त्वाचे साक्षीदार रोमिन व्होरा यांनी दिलेल्या माहितीनुसार, कॅप्टन सभ्रवाल यांचा मृतदेह रुग्णालयात आणण्यात आला तेव्हा तो बसलेल्या स्थितीत होता. त्यांचे दोन्ही हात विमानाचे नियंत्रण करणाऱ्या योकवर घट्ट पकडलेले होते. फेडरेशन ऑफ इंडियन पायलट्सचे अध्यक्ष कॅप्टन सी. एस. रंधावा यांनीही म्हटले आहे की कॅप्टन सभ्रवाल यांचे हात नियंत्रणावर होते.

# धार भोजशाळेत हनुमान चालिसा पठण हायकोर्टाच्या निर्णयानंतर भाविकांची गर्दी

■ भोपाळ

**मध्य** प्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठाने धार येथील वादग्रस्त भोजशाळा-कमाल मौला मशीद ही राजा भोज यांच्या काळातील वाग्देवी (सरस्वती देवी)चे मंदिर असल्याचा निर्णय दिला आहे. न्यायालयाने हिंदू पक्षाला येथे पूजेचा अधिकारही मंजूर केला आहे. या निर्णयानंतर आज सकाळी भाविकांनी आणि विविध समित्यांच्या पदाधिकाऱ्यांनी भोजशाळेत प्रवेश करून दर्शन घेतले. यावेळी पूजा-अर्चा करण्यात आली आणि हनुमान चालिसाचे पठणही करण्यात आले.

भोजशाळा मुक्ती यज्ञाचे संयोजक गोपाल शर्मा यांनी



म्हटले की, भोजशाळेचा प्रत्येक कण हा तिच्या मंदिर असण्याची साक्ष देतो. मुस्लीम पक्षाला सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे, परंतु भोजशाळा मंदिर होती, मंदिर आहे आणि नेहमीच मंदिर राहील. मुस्लीम पक्ष सर्वोच्च न्यायालयात जाण्याची शक्यता लक्षात घेऊन हिंदू पक्षाने सर्वोच्च न्यायालयात दोन कॅव्हेट याचिका दाखल केल्या आहेत. तसेच लंडनमधील संग्रहालयात ठेवलेली वाग्देवीची मूळ मूर्ती भारतात परत आणण्याच्या मागणीवरही न्यायालयाने विचार केला आहे. सध्या संपूर्ण धार शहर आणि भोजशाळा परिसरातील परिस्थितीवर प्रशासनाकडून कडक नजर ठेवली जात आहे.